
भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २७५ (१) अंतर्गत प्राप्त अनुदानातून राबविण्यात आलेल्या

# "आदिवासी मुलां-मुलींच्या शासकीय वसतिगृहामध्ये अद्ययावत स्वतंत्र संगणक कक्ष स्थापन करणे" या योजनेचा मूल्यमापन अहवाल




महाराष्ट्र शासन

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,

२८, क्वीन्स गार्डन, नविन सर्कीट हाऊस जवळ, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३६२०७१, फॅक्स क्र. ०२०-२६३६००२६, ई-मेल-trti.mah@nic.in

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | प्रस्तावना | १ |
| | प्रकरण पहिले | |
| १.१ | भारतीय राज्यघटना अनुच्छेद २७५ (१) | ३ |
| | प्रकरण दुसरे | |
| २ | शासकीय आदिवासी मुलां-मुलींच्या वसतिगृहात अद्ययावत स्वतंत्र कक्ष स्थापन करणे या योजनेची माहिती | ५ |
| | प्रकरण तिसरे | |
| ३.१ | मूल्यमापनाचे उद्देश | १३ |
| ३.२ | संशोधन कार्यपध्दती | १३ |
| ३.३ | क्षेत्रिय पाहणी | १५ |
| ३.४ | मूल्यमापन अभ्यासातील मर्यादा | १५ |
| | प्रकरण चौथे | |
| ४ | सांख्यिकीय माहितीचे विश्लेषण | १६ |
| | प्रकरण पाचवे | |
| ५.१ | पाहणी करण्यात आलेल्या वसतिगृहातील संगणक कक्षाची सद्यःस्थिती | १८ |
| ५.२ | वसतिगृहात उपलब्ध असलेल्या इतर सोयी सुविधांची माहिती | २८ |
| ५.३ | वसतिगृहातील मुलां-मुलींचा संगणक/इंटरनेट वापर व खर्च | ३४ |
| ५.४ | गटचर्चा | ३६ |
| ५.५ | योजना राबविण्यात येणाऱ्या अडचणी | ३९ |
| | प्रकरण सहावे | |
| ६.१ | निष्कर्ष | ४२ |
| ६.२ | शिफारसी | ४४ |
| | परिशिष्ट | ४७ |

## तक्ता


| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | राज्यातील आदिवासी साक्षरता तुलनात्मक प्रमाण | ०३ |
| २ | भा.सं.अनु.२७५ (१) अंतर्गत प्राप्त अनुदानातून सन २०११-१२ मधील मंजुर कामे | ०४ |
| ३ | राज्यातील आदिवासी मुलां-मुलींच्या वसतिगृहांची माहिती | ०६ |
| ४ | योजने अंतर्गत प्राप्त झालेल्या विविध बाबींचा खर्चासह तपशील | ११ |
| ५ | सदर योजने अंतर्गत प्रत्येक वसतीगृहास मंजूर संगणक व तत्सम यंत्रसामुग्रीची संख्या | १२ |
| ६ | मूल्यमापन पाहणीमध्ये सहभागी झालेल्या मुलां-मुलींची शैक्षणिक माहिती | १६ |
| ७ | मूल्यमापन पाहणीमध्ये सहभागी झालेल्या मुलां-मुलींची जमात, लिंग व शैक्षणिक शाखे-निहाय माहिती | १७ |
| ८ | योजने अंतर्गत प्राप्त संगणक व तत्सम यंत्रसामुग्रीची सद्यःस्थिती | |
| ८.१ | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, जव्हार जि.पालघर | १९ |
| ८.२ | आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, जव्हार जि.पालघर | २१ |
| ८.३ | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, मंचर जि. पुणे | २२ |
| ८.४ | आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, मंचर, जि. पुणे | २३ |
| ८.५ | आदिवासी मुलांचे वसतिगृह, डांग सौदाणे ता.सटाणा, जि.नाशिक | २४ |
| ८.६ | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, ता.कळवण, जि.नाशिक | २५ |
| ८.७ | आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, शारदासदन, नाशिक | २६ |
| ८.८ | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, पेठ रोड, नाशिक | २७ |
| ९ | आदिवासी शासकीय वसतिगृहांत संगणक संबंधित उपलब्ध सुविधा | २९ |
| १० | आदिवासी शासकीय वसतिगृहातील मुलां-मुलींनी प्राप्त संगणकीय प्रमाणपत्रे | ३१ |
| ११ | आदिवासी शासकीय वसतिगृहातील मुलां-मुलींची संगणक संबंधी कौशल्ये | ३१ |
| १२ | इंटरनेट वापर करता येणाऱ्या मुलां-मुलींची संख्या | ३२ |
| १३ | मोबाइल व्दारे होणारा इंटरनेटचा वापर करणाऱ्या मुलां-मुलींची संख्या | ३३ |
| १४ | आदिवासी शासकीय वसतिगृहा बाहेर संगणक/इंटरनेटचा वापर करणाऱ्यांची संख्या | ३३ |
| १५ | आदिवासी शासकीय वसतिगृहातील मुलां-मुलींचे संगणक वापराचे प्रमाण | ३४ |
| १६ | शासकीय आदिवासी वसतिगृहातील मुलां-मुलींचा इंटरनेटसाठी होणारा खर्च | ३५ |


## आलेख


| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | आदिवासी मुलां-मुलींच्या शासकीय वसतिगृहांबाबत माहिती | ०७ |
| २ | आदिवासी मुलां-मुलींच्या शासकीय वसतिगृहांतील प्रवेशाबाबतची माहिती | ०८ |
| ३ | मूल्यमापन पाहणीमध्ये सहभागी झालेल्या मुलां-मुलींची शैक्षणिक माहिती | १६ |

# प्रस्तावना

महाराष्ट्रात आदिवासी विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय व्हावी याकरिता शासनाकडून वसतिगृहे चालविण्यात येतात. यापैकी ९२ "आदिवासी मुलां-मुलींच्या शासकीय वसतिगृहामध्ये अद्ययावत संगणक कक्ष स्थापन करणे" ही योजना सन २०१२-१३ मध्ये राबविण्यात आली. सदर योजना राबविण्यात आलेल्या वसतिगृहांपैकी ८ वसतिगृहांची प्रत्यक्ष पाहणी तसेच गटचर्चाव्दारे मूल्यमापनाचे काम करण्यात आले.

सदर मूल्यमापन पाहणीचे क्षेत्रीय काम श्रीमती सीमा जोशी, उपसंचालक (एक्षेविका), श्री आनंद हेमाडे,(संशोधन सहाय्यक), श्रीमती अश्विनी सगणे,(संशोधन सहाय्यक), श्री ज्ञानेश्वर सांगळे,(संशोधन सहाय्यक) यांनी पूर्ण केले. सदर मूल्यमापनामध्ये तक्तीकरणाचे काम श्रीमती अश्विनी सगणे,(संशोधन सहाय्यक), श्री ज्ञानेश्वर सांगळे,(संशोधन सहाय्यक) यांनी पूर्ण केले. तसेच अहवाल लेखनाचे काम श्री ज्ञानेश्वर सांगळे,(संशोधन सहाय्यक) यांचे मदतीने श्रीमती सीमा जोशी (उपसंचालक) यांनी पूर्ण केले आहे.

सदर योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटी दूर करुन योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सदरचा मूल्यमापन अहवाल उपयोगी ठरेल, असे वाटते.

**(संभाजीराव सरकुंडे)**
**आयुक्त,**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे ०१.**

दिनांक : १४.०८.१५
ठिकाण : पुणे

## प्रकरण पहिले

### भारतीय राज्यघटना अनुच्छेद २७५ (१):पार्श्वभूमी

राज्यातील आदिवासी समाज हा पूर्वीपासून विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर मागासलेल्या डोंगराळ, दूर्गम भागात पारंपारिक पध्दतीने वास्तव्य करत आहे. या भागात असणारे दारिद्रय तसेच दळणवळण सोयी व तंत्रज्ञानाचा अभाव यामुळे त्यांना नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुरेपुर वापर करता येत नाही. आजही ते केवळ उदरनिर्वाहा पुरतीच शेती करून जगत आहेत. आदिवासी उप-योजनेच्या माध्यमातून आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात निधी देण्यात येतो, परंतु योजना राबविण्यात येणाऱ्या अडचणींमुळे, लोकसहभागाच्या अभावामुळे विकासाची लक्ष्ये पूर्णपणे साधली जात नाहीत. राज्याच्या बिगर आदिवासी व आदिवासी लोकसंख्येच्या मानव विकास निर्देशंकामध्ये तफावत दिसून येते. मानवी विकासाचे निर्देशांक जसे साक्षरता, आयुर्मान, बालमृत्युदर, मातामृत्युदर, उत्पन्न, अन्न सुरक्षा इत्यादी बाबत आदिवासींची स्थिती तुलनेने खालावलेली दिसून येते.

विकासाकरिता मोठी धरणे बांधणे, खाणकाम प्रकल्प, वन्यप्राणी संरक्षणासाठी अभयारण्ये इत्यादी कारणांमुळे स्वातंत्र्यानंतर हजारो आदिवासींना आपल्या मूळस्थानापासून विस्थापित व्हावे लागले आहे. या विस्थापनामुळे जंगलापासून मिळणारे अन्न, गौण वन उत्पादने व त्या द्वारे होणारी आर्थिक प्राप्तीपासून वंचित राहावे लागत आहे. जंगल, वन क्षेत्रामध्ये येणारी घट यामुळे वन आधारीत उपजिवीकेवर अवलंबून असणाऱ्या आदिवासींची स्थिती खालावलेली आहे.

वरील सर्व बाबींचे अवलोकन केले असता असे दिसते की, जर आदिवासींना साधन संपत्ती मधील योग्य हिस्सा द्यायचा असेल तर सध्या लोकसंख्येच्या प्रमाणात मिळणाऱ्या निधी पेक्षा जास्त देण्याची आवश्यकता आहे. केंद्र शासनाव्दारे सामाजिक क्षेत्र व उपजिविका यावर होणारा खर्च वाढला असला तरी अडचणीमुळे योजनांचा लाभ आदिवासी पर्यंत पोहचत नाही. आदिवासी भागामधील प्रशासन गतिमान व कार्यक्षम बनविण्यासाठी पायाभूत सोयी-सुविधांमध्ये वाढ करणे आवश्यक आहे. पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी आदिवासी उपयोजनामधील मोठा हिस्सा शाळा, वसतिगृहे बांधणे तसेच रस्ते, पिण्याचे पाणी, स्वच्छता, उपजिवीका, वीज, सौरउर्जा याकरिता प्राधान्याने खर्च केला जातो.(केंद्र शासनाच्या भारतीय राज्यघटनेच्या २७५ (१) संबंधीत मार्गदर्शक सुचनांप्रमाणें)

आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शैक्षणिक पायाभुत सोयी-सुविधा पुरविणे क्रमप्राप्त आहे. ग्रामीण विकासाच्या संकल्पनेमध्ये शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्व आहे. त्यासाठी ग्रामीण व आदिवासी भागामध्ये शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात होणे ही आधुनिक काळाची गरज आहे. त्यादृष्टीने गेल्या काही वर्षात शासन अनेक योजना राबवित आहे. तरी आदिवासींचे साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. जनगणना २०११, नुसार खालीलप्रमाणे राज्यातील आदिवासींचे साक्षरतेचे प्रमाण देण्यात आले आहे. तक्ता क्र. ०१ चे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, राज्यातील बिगर आदिवासी व आदिवासी समाजाच्या साक्षरतेमध्ये तफावत आहे.

**तक्ता क्र. १. राज्यातील आदिवासींचे लिंगनिहाय साक्षरतेचे तुलनात्मक प्रमाण**

| राज्य | ग्रामीण (%) | नागरी (%) | एकुण (%) |
|---|---|---|---|
| एकूण पुरूष | ८५.१५ | ९२.१२ | ८८.३८ |
| आदिवासी पुरूष | ७२.२० | ८६.१० | ७४.३० |
| एकूण स्त्री | ६४.८० | ७५.७५ | ६९.८७ |
| आदिवासी स्त्री | ५४.१० | ७४.१० | ५७.०० |

राज्य शासन आदिवासी जनतेच्या शैक्षणिक उन्नतीकरीता प्रयत्नशील असुन त्या करिता आश्रमशाळा व वसतीगृहे सुरु करण्यात आलेली आहेत. आदिवासी मुला-मुलींसाठी शासनामार्फत प्राथमिक व माध्यमिक शिक्षण देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या एकूण आश्रमशाळांपैकी ५४७ शासकीय आश्रमशाळांमध्ये एकुण १,८७,२१६ विद्यार्थी शिकत आहेत, तर ५५६ अनुदानित आश्रमशाळांमध्ये एकुण २,१०,८७४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आश्रमशाळेमधील शिक्षण पूर्ण केल्यानंतर आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक उन्नती करिता उच्च शिक्षण घेता यावे म्हणून विभागीय स्तरावर, जिल्हा स्तरावर, व तालुका स्तरावर वसतिगृहे सुरू करण्यात आलेली आहेत.

## १.१ भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत अनुदान

भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद २७५(१) अन्वये राज्याला आवश्यक विकास योजनांवर खर्च करण्यास सक्षम बनविण्यासाठी केंद्र शासनाच्या मंजुरीने खालील उद्दीष्टांची पुर्तता करण्यासाठी आवर्ती खर्च अनुदान म्हणुन दिले जाते:

(१) राज्यातील अनुसुचित जमातीचे कल्याणाकरिता किंवा

(२) अनुसुचित क्षेत्रातील प्रशासनाचा दर्जा उंचावण्याकरिता.

भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५ (१) अन्वये प्राप्त अनुदानातून आतापर्यंत खालील विविध स्वरूपाची कामे हाती घेण्यात आलेली आहेत.

१) आदिम जमातीसाठी घरे, साठवण बंधारे, रस्ते व पुल, संरक्षण भिंत, शाळा व वसतिगृह इमारत, बहुद्देशिय सांस्कृतिक केंद्र, प्रशिक्षण केंद्र आणि बस स्थानक इ. बांधणे किंवा पुर्नबांधणी करणे.

२) विद्युत संयंत्र स्थापन करणे, सौर उर्जा पॅनेल बसविणे, संगणक कक्ष स्थापन करणे, आश्रम शाळेत विज्ञान केंद्र (सायन्स सेंटर) उभारणे, फिरते वाचनालय सुरू करणे, ग्रंथालय स्थापन करणे इ.

३) वन-हक्क कायदा (FRA), EMRS देखभाल/आवर्ती खर्च, शेतकरी उत्पादक संघ स्थापन करणे, फलोत्पादन योजना, इको व्हिलेज, पळस पाने उत्पादन प्रकल्प, पर्यटन सुविधा, इ. कामांकरीता निधी प्राप्त झालेलाआहे.

- सन २०११-१२ या आर्थिक वर्षामध्ये केंद्र शासनाकडून भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत खालील नमुद करण्यात आलेल्या ३ कामांसाठी भांडवली मालमत्ता (Capital Assets) अनुदान म्हणून एकुण रु.९,१५,८४,००० /- (रु.नऊ कोटी पंधरा लक्ष . चौऱ्याऐंशी हजार फक्त) अनुदान मंजुर करण्यात आले व सदर कामांच्या मार्गदर्शक सुचनांनुसार खर्च करण्यास शासनाने सन २०१२-१३ मध्ये मंजुरी दिली.

**तक्ता क्र. २. भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५ (१) अंतर्गत प्राप्त अनुदानातुन सन २०११-१२ मधील मंजुर कामांची यादी:**

| अ.क्र | मान्यता दिलेल्या कामांचा तपशील | शासन निर्णय दि.१७.३.२०१२ अन्वये मंजूर रक्कम (लाखात) | सन २०११-१२ मध्ये अहरीत केलेली रक्कम (लाखात) | सन २०११-१२ मध्ये अहरीत करावयाची रक्कम (लाखात) |
|---|---|---|---|---|
| 1. | Estabishment of solar power plant for the particularly vulnerable Group villages (with consultancy charges) | १८०.०० | ११३.९४ | ६६.०६ |
| २ | Construction of S.T. Bus Stands in Tribal villages | ४००.०० | ०.०० | ४००.०० |
| ३ | **Establishment of well equipped computer Lab in Govt. Boys and Girls hostel** | **४४९.७८** | **०.००** | **४४९.७८** |
| | | | **एकूण** | ९१५.८४ |

वरील तीन योजनांपैकी शासकीय आदिवासी मुला-मुलींच्या वसतिगृहात अद्ययावत संगणक कक्षाची स्थापना करणे ही योजना आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांचे स्तरावर सन २०१२-१३ मध्ये पूर्णपणे राबवून झाली आहे. सबब शासनाच्या आदेशाप्रमाणे योजना पुर्णपणे राबवून झाल्यानंतर सदर योजनेचे मूल्यमापनाव्दारे फलनिष्पत्ती पाहणे तसेच योजनेमध्ये आवश्यक असलेल्या सुधारणा सुचवणे इत्यादीसाठी मूल्यमापन पाहणीचे काम हाती घेण्यात आले.

## प्रकरण दुसरे

## आदिवासी मुलां-मुलींच्या शासकीय वसतिगृहात अद्यावत संगणक कक्ष स्थापन करणे या योजनेची माहिती:

आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे असल्याने आदिवासी विद्यार्थी/विद्यार्थ्यांनींना संगणकाचे ज्ञान अवगत असणे अत्यंत गरजेचे आहे. संगणकीय युग असल्या कारणाने वसतिगृहातील विद्यार्थी-विद्यार्थ्यांनींना शिक्षण पूर्ण केल्यानंतर इतर शैक्षणिक संस्थामधील विद्यार्थ्यांबरोबर स्पर्धा करावी लागते. त्यामुळे इतर शैक्षणिक संस्थातील विद्यार्थ्यांपेक्षा आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थी-विद्यार्थिंनीं माहिती व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मागे पडू नये व पुढील शिक्षणासाठी तसेच नोकरी मिळविण्यासाठी त्यांना त्याचा फायदा व्हावा याकरिता शासकीय आदिवासी मुलां-मुलींच्या वसतिगृहामध्ये अद्ययावत संगणक कक्षाची स्थापना करणे ही योजना शासनामार्फत राबविण्यात आलेली आहे. आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या व स्पर्धेच्या युगात आदिवासी विद्यार्थी / विद्यार्थिनींना त्यांच्यात असलेले बौध्दिक ज्ञान सिध्द करण्यासाठी संधी निर्माण करुन दिल्यास त्यांचा शैक्षणिक विकास घडवून येणे शक्य होईल. यामुळे कोणत्याही क्षेत्रातील आव्हाने पेलण्याचा आत्मविश्वास नक्कीच वाढेल. तसेच, इतर कोणत्याही क्षेत्रात त्यांना पर्दापण करण्यासाठी मदत होईल त्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करुन आदिवासी मुलां-मुलींच्या संगणकीय ज्ञानात भर टाकणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.

### महाराष्ट्र शासनाचे ई-प्रशासन धोरण, २०११

महाराष्ट्र शासन देशामध्ये ई-शासन व माहिती आणि संगणक तंत्रज्ञानाचा पाया रचणाऱ्यांपैकी एक आहे. महाराष्ट्र शासन हे नागरीकांच्या गरजा आणि उत्तम प्रतीची सेवा पुरविणाऱ्या ई-प्रशासन बाबतचे कार्यक्रम राबविण्यात आघाडीवर आहे.

### योजनेची व्याप्ती :-

"आदिवासी मुलां-मुलींच्या शासकीय वसतिगृहामध्ये अद्ययावत स्वतंत्र संगणक कक्ष स्थापन करणे" ही योजना राबविण्याकरिता आदिवासी मुलां-मुलींच्या वसतिगृहांची निवड खालील निकषांच्या आधारे करण्यात आली :-

(१) आदिवासी मुलां-मुलींची अशी वसतिगृहे की जी शासकीय मालकीच्या जमिनीवर बांधण्यात आलेली आहेत.

(२) ज्या आदिवासी मुलां/मुलींच्या शासकीय वसतिगृह इमारतीत स्वतंत्र संगणक कक्ष नाही परंतू वसतिगृहामध्ये स्वतंत्र जागा उपलब्ध आहे. अशा वसतिगृहांची प्रकल्प अधिकारी यांनी केलेली शिफारस. सदर योजनेमध्ये आदिवासी विकास विभागा अंतर्गत असलेल्या १७ जिल्हयातील २३ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या क्षेत्रातील एकूण ९२ आदिवासी मुलां-मुलींच्या शासकीय वसतीगृहांमध्ये सदर योजना राबविण्यात आलेली आहे.

**राज्यातील आदिवासी मुलां-मुलींची वसतिगृहेः**

राज्यातील आदिवासी मुलां-मुलींची तसेच मागासवर्गीय मुलां-मुलींची शिक्षणाची सोय व्हावी आणि त्यांना माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण मिळावे याकरीता तालुका, जिल्हा व विभागीय पातळीवर वसतिगृहे सुरू करण्यात आलेली आहेत. या वसतिगृहातून मोफत भोजन व राहण्याची सोय केली जाते. तसेच इतर सोयी दिल्या जातात. तालुका व जिल्हा पातळीवरील वसतिगृहात माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १० टक्के, कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी २५ टक्के आणि उच्च मांध्यमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ६५ टक्के या प्रमाणात प्रवेश दिला जातो. तसेच विभागीय पातळीवरील वसतिगृहात कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी २० टक्के आणि उच्च महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ८० टक्के या प्रमाणात प्रवेश देण्यात येतो.

**तक्ता क्र. ३. राज्यातील आदिवासी मुलां-मुलींच्या वसतिगृहांची माहिती (२०१४-१५)**


| अ. क्र. | तपशील | मुलांचे वसतिगृह | | | मुलींचे वसतिगृह | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण संख्या | मंजूर प्रवेश क्षमता | प्रत्यक्षात विद्यार्थी क्षमता | एकूण संख्या | मंजूर प्रवेश क्षमता | प्रत्यक्षात विद्यार्थ्यांची क्षमता एकूण |
| १ | राज्यात एकूण वसतिगृह | २८३ | ३५८२२ | ३५१५० | २०७ | २२४६८ | २०४०० |
| २ | शासकीय मालकीच्या जमिनीवर बांधलेली एकूण वसतिगृह | ८४ | ११९०० | १०५०० | ४८ | ५२०० | ५००० |
| ३ | सदर योजनेअंतर्गत ९२ वसतिगृहाची माहिती | ६२ | ७४२५ | ७४७२ | ३० | ३३३५ | ३५१७ |

(स्त्रोतः आदिवासी विकास विभाग, नाशिक)

वरील तक्ता क्रमांक (०३) नुसार, राज्यात आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी मुलां/मुलीं करिता एकूण (४९०) वसतिगृहे चालविण्यात येत असून एकूण (५५,५५०) मुले-मुलीं या योजनेचा लाभ घेत आहेत. यापैकी (२८३) वसतिगृहे ही आदिवासी मुलांची आहेत व उर्वरित (२०७) वसतिगृहे आदिवासी मुलींची आहेत. आदिवासी मुलांच्या एकूण (२८३) वसतिगृहांपैकी (८४) वसतिगृहे ही शासकीय मालकीच्या जमिनीवर बांधलेली आहेत. तर आदिवासी मुलींसाठी असलेल्या एकूण (२०७) वसतिगृहांपैकी (४८) वसतिगृहे ही शासकीय मालकीच्या जमिनीवर

बांधण्यात आलेली आहेत. आदिवासी मुलांसाठी सुरु असलेल्या २८३ वसतिगृहांची मंजूर विद्यार्थी प्रवेश क्षमता सुमारे ३५८२२/- असून प्रत्यक्षात ३५१५०/- विद्यार्थी सदर वसतिगृहात राहतात. तर आदिवासी मुलींच्या २०७ वसतिगृहाची मंजूर प्रवेश क्षमता २२४६८/-असताना सध्या २०४००/- विद्यार्थिनी राहत होत्या.


सद्यस्थितीत सदर योजना राज्यातील ९२ आदिवासी मुलां/मुलींच्या वसतीगृहात राबविण्यात आली यापैकी ६२ मुलांचे व ३० मुलींची वसतिगृहे होती. सदर योजनेअंतर्गत निवड करण्यात आलेल्या ६२ मुलांच्या वसतिगृहाची मंजूर प्रवेश क्षमता ७४२५ होती तर प्रत्यक्षात ७४७२ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला होता. तसेच सदर योजनेअंतर्गत निवड करण्यात आलेल्या मुलींच्या ३० वसतिगृहामधील मंजूर प्रवेश क्षमता ३३३५ होती तर प्रत्यक्षात ३३१७ विद्यार्थिनींना प्रवेश देण्यात आलेला होता. राज्यात शासकीय मालकीच्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या एकुण १३२ आदिवासी मुलां-मुलींच्या वसतिगृहांपैकी ६२ आदिवासी मुलांच्या व ३० आदिवासी मुलींच्या वसतिगृहांमध्ये सदर योजना राबविण्यात आली.




आलेख नं. १ . आदिवासी मुलां-मुलींच्या शासकीय वसतिगृहांबाबत माहिती

वरील आलेख क्र.१ वरुन असे निर्दशनास येते की, राज्यातील शासकीय मालकीच्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या आदिवासी मुलांच्या ८४ वसतिगृहांपैकी ६२ आदिवासी मुलांच्या वसतिगृहांमध्ये म्हणजे सुमारे ७४ टक्के वसतिगृहांमध्ये सदर योजना राबविण्यात आलेली आहे.

तथापि, शासकीय मालकीच्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या आदिवासी मुलांच्या २२ वसतिगृहामध्ये म्हणजेच २६ टक्के वसतिगृहामध्ये सदर योजना राबविणे अद्याप बाकी आहे. तसेच राज्यातील शासकीय मालकीच्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या आदिवासी मुलींच्या ४८ वसतिगृहांपैकी ३० आदिवासी मुलींच्या वसतिगृहांमध्ये म्हणजे सुमारे ६२.५ टक्के वसतिगृहांमध्ये सदर योजना राबविण्यात आलेली आहे. तथापि, शासकीय मालकीच्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या आदिवासी मुलींच्या १८ वसतिगृहांमध्ये म्हणजेच ३७.५ टक्के वसतिगृहांमध्ये सदर योजना राबविणे अद्याप बाकी आहे.




आलेख नं. २ : आदिवासी मुलां-मुलींच्या शासकीय वसतिगृहांतील प्रवेशाबाबतची माहिती

**योजने संबंधी खर्चाची माहिती:-**

शासन निर्णय क्र. केंद्रीय-२०११/प्र.क्र.४४/का.१९ नुसार दिनांक १७ मार्च, २०१२ अन्वये २०११-१२ या वर्षात केंद्र शासनाकडुन भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५ (१) अंतर्गत शासकीय आदिवासी मुलां-मुलींच्या वसतिगृहात अद्ययावत संगणक कक्ष स्थापन करणे ही योजना मंजुर करण्यात आली होती. या योजने करीता मंजुर निधी रुपये ४४९.७८ लक्ष सन २०११-१२ मध्ये उपलब्ध झाला नाही. सदर निधी शासन निर्णय क्र. केंद्रीय-२०११/प्र.क्र.४४/का. १९ दिनांक ०४.०२.२०१३ अन्वये रु. ९१५.८४ लक्ष मंजूर निधी सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात उपलब्ध करुन देण्यात आला. या पैकी उक्त योजनेसाठी रू. ४४९.७८ लक्ष निधी कोषागारातून आहरीत करण्यात आला. शासन निर्णय क्र. केंद्रीय-२०११/प्र.क्र.४४/भाग-२/का-१९ दिनांक ०४.०२.२०१३ अन्वये सदर योजनांच्या मार्गदर्शक सुचनांना मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर योजना राबविण्यासाठी निवड करण्यात आलेल्या ९२ वसतिगृहामध्ये प्रत्येकी रु. ४,८८,८९२/- च्या

मर्यादेत एकूण रु. ४४९.७८ लक्ष अधिन राहुन केंद्र अथवा राज्य शासनाकडील दर करारानुसार विविध संस्थामार्फत आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक मार्फत खरेदी करण्यात आली.

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

संगणक टेबल व खुर्ची संबंधी शासन निर्णयः क्र. भासंअनु-२०१३/प्र.क्र.०८/का. ८(४)/नाशिक दिनांक ०२ मार्च, २०१३ आणि संगणक, रॅम व प्रिंटर संबंधी शासन निर्णयः क्र. भासंअनु-२०१३/प्र.क्र.०८/का. ८(४)/नाशिक दिनांक २८ फेब्रुवारी, २०१३ अन्वये आवश्यक वस्तुंची खरेदी, स्पेसीफिकेशन, तपासणी, वाहतुक व इतर बाबींच्या निकषांबाबतच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे होत्याः

- शासन स्तरावरील दर करारानुसार पुरवठा धारकाकडून दर करारातील अटी व शर्तीच्या अधिन राहून संगणक, प्रिंटर, टेबल, खुर्ची व इतर अनुषंगिक साहित्य आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक हे साहित्याची खरेदी करतील.

- खरेदी केलेले साहित्य (संगणक, प्रिंटर, टेबल, खुर्ची) निवड केलेल्या वसतिगृहांना ४५ दिवसांमध्ये थेट पुरवठा केला जाईल. पुरवठा विहीत मुदतीत न झाल्यास दंड आकारण्यात यावा.

- सदर संगणक व प्रिंटरचा पुरवठा शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात आलेल्या वसतिगृहावर पुरवठादाराने स्वखर्चाने करणे बंधनकारक असेल.

- संगणक व प्रिंटर या पुरवठा केलेल्या साहित्याची वॉरंटी ३ (तीन) वर्षाची राहील. तीन वर्षापर्यंत पुरवठा केलेल्या साहित्याची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी पुरवठाधारक एजन्सीची राहील.

- पुरवठा पुर्ण झाल्यानंतर प्रकल्प अधिकारी / अपर आयुक्त यांच्याकडून Installation अहवाल मागविण्यात येईल.

- पुरवठा झालेल्या साहित्याची (संगणक, प्रिंटर, टेबल व खुर्ची) नोंद वसतिगृहांच्या जडसंग्रह नोंदवही मध्ये घेण्यात यावी.

- वसतिगृहास प्राप्त झालेले साहित्य (संगणक, प्रिंटर, टेबल, खुर्ची) संबंधीत गृहपालांच्या नियंत्रणाखाली राहील.

- योजना राबविणाऱ्या संस्थेने योजना राबविण्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित नमुन्यात सादर करावे.

- पुरवठा करावयाचे साहित्याची तांत्रिक दृष्टया व स्पेसिफिकेशन प्रमाणे योग्य असल्याबाबत प्रमाणपत्र प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांचेकडून रँडम तपासणी करुन घेणे बंधनकारक राहील.

- योजने अंतर्गत प्राप्त साहित्य विनिर्देशाप्रमाणे असल्याची खात्री करून सदर साहित्य मिळाल्यापासुन १० दिवसांत प्रकल्प अधिकारी यांनी साहित्य योग्य असल्याचा अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

- लक्षांकात बदल, करण्याचे अधिकार आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना राहतील.

**योजने अंतर्गत संगणक व इतर यंत्रसामुग्रीचा पुरवठा:**

सदर योजने अंतर्गत संगणक व तत्सम यंत्रसामुग्रीचा पुरवठा ॲरीथमेटिक सिस्टीम आणि टेक्नोलॉजीस्ट प्रायव्हेट लि. कंपनी, पुणे, विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ , नाशिक व क्रेस्ट सेल्स प्रायव्हेट लिमीटेड, मनोराज कॉम्लेक्स, घनकर लेन, रेड क्रॉस, नाशिक या संस्थामार्फत करण्यात आला.

या संदर्भात आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांनी दिलेल्या माहितीनुसार सदर योजना राबविण्यासाठी निवडण्यात आलेल्या सर्व वसतिगृहांना संगणक, यु.पी.एस. व प्रिंटर इ. चा पुरवठा योग्य मुदतीत झालेला आहे. परंतु विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, नाशिक यांच्यामार्फत संगणक टेबल व खुर्चीचा पुरवठा मुदतीत झालेला नाही. शासन निर्णयामध्ये नमुद नियमावलीस अनुसरून उशिरा पुरवठा करणाऱ्या पुरवठा धारकांस दंड आकारण्यात आला. अशाप्रकारे दंडाची एकुण रक्कम रु. ७०५२२.०० पैकी रु. ५७१४७.०० वसुली करण्यात आलेली आहे. दंडाची उर्वरीत रक्कम रु. १३३७५.०० वसुली करणे अद्यापपर्यंत बाकी असुन या संदर्भात संबंधीतांशी पत्रव्यवहार सुरू असल्याची माहिती आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांनी दिली.

सदर योजने अंतर्गत पुरवठा करण्यात आलेल्या संबंधित सामुग्रीची तपासणी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांच्यामार्फत करण्यात आली असल्याची माहिती आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांच्यामार्फत प्राप्त झाली.

सदर योजने अंतर्गत पुरवठा करण्यात आलेल्या विविध बाबींचा तपशील, संख्या, प्रति नग किंमत, व झालेला एकुण खर्च याबाबतची माहिती तक्ता क्र. ४ व ५ मध्ये नमुद करण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र. ४. योजने अंतर्गत प्राप्त झालेल्या विविध बाबींचा खर्चासह तपशिल.**

| अ.क्र | पुरवठा धारकाचे नांव | पुरवठा करण्यात आलेल्या बाबींचा तपशिल | संख्या | प्रति नग किंमत | एकुण खर्च (लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| १. | ॲरीथमेटिक सिस्टीम आणि टेक्नोलॉजीस्ट प्रायव्हेट लि. कंपनी, पुणे | Lenovo Brand Desktop with Intel core i५/२gb RAM/३२० gb HDD/१८.५ TFT Monitor/Windows ७ Professional operating system | ८२८ | ३९३४८.८१ | ३२५.८१ |
| | | DDR२ २ GB DDR २ RAM ६६७ MHz Additional | ८२८ | १२३०.०४ | १०.१८ |
| | | Samsung Printer Resolution (in dpi) Mono ६००x६०० paper size; A४ print speed in PPM (A४ size) ;१४ port:१ USB Memory (in MB); NA Network card १०/१००:NA Duplexing:NA | २७६ | ५२५० | १४.४९ |
| २. | विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ नाशिक | Computer table work station H.७५०xW.६१०xL.९१०mm | ८२८ | ३४४६ | २८.५३ |
| | | Revolving chair Low Back Handle W ६५०mm D. ६५०mm, H. ८००-९०० mm adjustability of seat H४२०mm to ५२०mm | ८२८ | ३३०९.०० | २७.४० |
| ३ | क्रेस्ट सेल्स प्रायव्हेट लिमीटेड, मनोराज कॉम्लेक्स, घनकर लेन, रेड क्रॉस, नाशिक, ४२२ ००१ | Linr. Interactive UPS with rated ०.६५ Kva AVR for singal phase AC १६०v to २८०v input (Min. VAH-४००) | ८२८ | ३५११.०० | २९.०७ |
| | | Brother Laser printer Resolution (in dpi) Mono ६००६०० paper size:A४ print speed in PPM (A४ size):२५ port:१ USB memory (in MB) :NA: Network card १०/१००: YES duplesing:yes | १५९ | ८९६७ | १४.२६ |

सदर योजने संबंधी नमुद शासन निर्णया नुसार प्रत्येकी ३ प्रिंटरची निवड झालेल्या वसतिगृहांना पुरवठा करण्यात आला. परंतु शासन निर्णयानुसार सर्व बाबींची खरेदी झाल्यानंतर १४.२९ लक्ष इतकी रक्कम शिल्लक राहत असल्यामुळे उक्त दर करारानुसार क्रिस्ट सेल्स प्रा. लि. नाशिक यांना आदिवासी आयुक्तालय, नाशिक यांचे आदेश क्र. भासअनु-२-१३/प्र.क्र.०८ भाग-क्र.०३/का.८(४) दिनांक १९ ऑक्टोबर, २०१३ अन्वये १५९ प्रिंटरचा पुरवठा करण्याचे आदेश प्राप्त झाले. सबब संबंधित वसतिगृहांना प्रिंटरची संख्या ३ ऐवजी ५ अशी मंजूर झाली.

**तक्ता क्र. ५: शासन निर्णयानुसार सदर योजने अंतर्गत प्रत्येक वसतीगृहास मंजूर संगणक व तत्सम यंत्रसामुग्रीची संख्या**

सदर योजने अंतर्गत निवड झालेल्या प्रत्येक वसतिगृहास प्राप्त संगणक व इतर यंत्रसामुग्रीचा तपशील खालीलप्रमाणे (तक्ता क्र. ५ नुसार)

| वसतिगृहास प्राप्त बाबींचा तपशील | संख्या |
|---|---|
| संगणक | ९ |
| प्रिंटर | ३ |
| यु. पी. एस. | ९ |
| खुर्ची | ९ |
| संगणक टेबल | ९ |

## प्रकरण तिसरे

आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी जनतेसाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविल्या जातात. या योजनांचा आदिवासींच्या जीवनमानावर होणारा परिणाम, योजना राबविताना निर्माण होणाऱ्या अडचणी, साध्य झालेली लक्ष्ये यांचा सखोल अभ्यास करून योजना आणखी प्रभावीपणे राबविणे याकरीता आवश्यक बदल सुचविण्यासाठी योजनांचे मूल्यमापन अभ्यास हाती घेणे आवश्यक असते.

### ३.१ मूल्यमापनाचा उद्देश :-

केंद्रशासनाच्या भारतीय संविधानाचे कलम २७५(१) अंतर्गत विविध योजनांसाठी केंद्र शासनामार्फत राज्यशासनास आदिवासी कल्याणाकरिता अनुदान उपलब्ध करुन दिले जाते. त्यापैकी सन २०१२-१३ या वर्षी महाराष्ट्र राज्यातील "आदिवासी मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहात अद्यावत स्वतंत्र संगणक कक्ष स्थापन करणे " या योजनेचे मूल्यमापन करण्यासाठी खालीलप्रमाणे उद्देश आहे.

१) योजनचे मुख्य उद्दीष्टे कितपत साध्य झाले?

२) सदरील योजना सुरु केल्याने विद्यार्थ्यांना शैक्षणिक कार्यात सहाय्यकारी ठरली किंवा कसे?

३) विद्यार्थ्यांना नोकरी / व्यवसायात सहाय्यभूत ठरु शकेल किंवा कसे? हे पाहणे.

४) योजनेच्या अंमलबजावणीबाबत येणाऱ्या अडचणी व त्रुटींचा शोध घेणे.

५) योजनेच्या फल निष्पतीबाबत अभ्यास करुन योजना अधिक लाभदायक होण्यासाठी संबंधिताचे अभिप्राय जाणून घेणे.

या प्रमुख उद्दीष्टां बरोबरच सदर योजने अंतर्गत प्राप्त संगणक व तत्सम यंत्रसामुग्रीची सद्यस्थितीची पाहणी करणे, विद्यार्थ्यांनी आत्मसात केलेली संगणकीय कौशल्ये, वसतिगृहातील विद्यार्थ्यांचा संगणक व इंटरनेट या बाबींवर होणारा खर्च याबाबत माहिती घेण्यात आली.

### ३.२ मूल्यमापनाची कार्यपध्दती व नमुना निवडः-

"आदिवासी मुला- मुलींच्या शासकीय वसतिगृहात अद्ययावत स्वतंत्र संगणक कक्ष स्थापन करणे " ही योजना राज्यघटनेच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत प्राप्त अनुदानातून सन २०१२-१३ मध्ये २३ प्रकल्प कार्यालया अंतर्गत असणाऱ्या ९२ वसतिगृहात राबविली गेली. सदर योजनेच्या मूल्यमापन अभ्यासांकरिता Post-Facto-Evaluation Research Methods या संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला. सदर योजनेच्या मूल्यमापन पाहणीकरिता यादृश्चिक नमुना निवड

पध्दतीचा (Random Sampling Method) अवलंब करण्यात आला. सदर योजना राबविण्यात आलेल्या ९२ वसतिगृहांपैकी ८ आठ वसतिगृहांची निवड मूल्यमापन पाहणीकरिता करण्यात आली. एकुण ९% नमुना आकार अभ्यासाकरिता घेण्यात आला. एकुण चार पैकी दोन विभागातून (ठाणे, नाशिक) प्रत्येकी दोन प्रकल्प कार्यालयाची निवड यादृश्चिक पध्दतीने (Random Sampling Method) करण्यात आली. नमुना निवड करताना दुर्गम व शहरा जवळच्या वसतिगृहांची समान प्रमाणात निवड करून भौगोलिक प्रतिनिधित्वामध्ये योग्य संतुलन राखण्यात आले. सदर योजनेच्या तुलनात्मक मूल्यमापन पाहणी करण्यासाठी निवड केलेल्या विभागातील (ATC मधील) एक प्रकल्प कार्यालय दुर्गम/डोंगराळ भागातील तर दुसरे प्रकल्प कार्यालय शहरालगतचे निवडण्यात आले. निवड करण्यात आलेल्या ४ प्रकल्प कार्यालया अंतर्गत येणाऱ्या प्रत्येकी एक मुलींचे व एक मुलांचे असे एकूण आठ वसतिगृहांची निवड करुन त्याठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन प्रश्नावलीव्दारे माहिती संकलन पूर्ण करण्यात आले.

तसेच वसतिगृहातील मुलां-मुलींचा संगणक वापर, सदर योजना राबविताना येणाऱ्या अडचणी व योजने संबंधीत गृहपालांचे अभिप्राय इ. मुद्यांबाबत माहिती घेण्यासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे येथे प्रशिक्षणासाठी आलेल्या काही निवडक आदिवासी मुलां-मुलींच्या शासकीय वसतिगृहांच्या गृहपालांची गटचर्चा घेण्यात आली. या गटचर्चेमध्ये सदर योजना राबविलेल्या वसतिगृहांचे ६ गृहपाल व योजना न राबविलेल्या वसतीगृहांचे १४ गृहपाल असे एकुण २० गृहपाल सहभागी झाले होते.

सदर मूल्यमापन पाहणी मध्ये प्राथमिक व दुय्यम माहिती स्त्रोत या दोन्ही साधनांचा उपयोग करून योजने संबंधी माहिती व आकडेवारी संकलीत करण्यात आली. प्राथमिक सामग्रीसाठी सदर योजना राबविण्यात आलेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांकडून तसेच संबंधित गृहपालांकडून विहीत प्रश्नावलीमध्ये माहिती घेण्यात आली. त्याच बरोबर विहीत प्रश्नावली मध्ये योजनेच्या अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणाकडून माहिती घेण्यात आली. दुय्यम माहिती स्त्रोतांमध्ये योजनेच्या निगडित विविध केंद्र व राज्य शासन निर्णय, योजनेचा प्रगती अहवाल इत्यादीचा अभ्यास करण्यात आला.

**विविध स्तरावरील पत्रके :-**

शासकीय आदिवासी मुलां-मुलींच्या वसतिगृहात अद्यावत संगणक कक्ष स्थापन करणे या योजनेचे मूल्यमापन करण्यासाठी खालील प्रमाणे स्वतंत्र प्रपत्रे तयार करण्यात आली व या माध्यमातून योजने संबंधी गुणात्मक व संख्यात्मक माहिती संकलीत करण्यात आली.

१) आयुक्त आदिवासी विकास विभाग, नाशिक यांचे कार्यालय यांचे स्तरावरील पत्रक

२) निवड करण्यात आलेल्या प्रकल्प कार्यालय स्तरावरील पत्रक

३) निवडण्यात आलेले वसतिगृहातील गृहपाल / वॉर्डन स्तरावरील पत्रक

४) वसतिगृहातील विद्यार्थी / विद्यार्थ्यांनी स्तरावरील पत्रक

**३.३ क्षेत्रिय कामाचा कालावधी :-**

सदर योजनेच्या मूल्यमापन पाहणीचे क्षेत्रिय कामकाजामध्ये नमुना निवड पध्दतीने निवडलेल्या आठ वसतिगृहांस प्रत्यक्ष भेट देऊन विहीत केलेल्या स्वतंत्र प्रश्नावली मध्ये माहिती घेण्यात आली. अशाप्रकारे क्षेत्रीय कामकाज दिनांक १५ एप्रिल, २०१५ ते दिनांक २५ एप्रिल, २०१५ अखेर पूर्ण करण्यात आले.

**सांख्यिकीय माहिती विश्लेषणाचे तंत्रः**

व्दितीय माहिती स्त्रोताव्दारे संकलित केलेल्या माहितीचा उपयोग प्रस्तावना, योजनेची माहिती व वर्णनात्मक विश्लेषणासाठी करण्यात आला. प्राथमिक स्त्रोताव्दारे संकलित केलेल्या माहितीचा उपयोग वर्णनात्मक व अनुमानात्मक विश्लेषण करण्यासाठी करण्यात आला. सांख्यिकीय माहिती विश्लेषणासाठी MS-Excel चा वापर करण्यात आला.

**३.४ मूल्यमापन अभ्यासातील मर्यादाः**


तसेच सदर योजनेचे मूल्यमापन क्षेत्रीय काम (Field Work) मध्ये माहिती संकलन करण्यास १५ एप्रिल, २०१५ या तारखेला सुरुवात करण्यात आली होती. निवड करण्यात आलेल्या वसतिगृहात योजनेच्या मूल्यमापनासंबंधी माहिती घेण्यासाठी गेले असता असे समजले की काही मुलां-मुलींच्या परीक्षा संपल्यामुळे ते त्यांच्या गावी परतले होते, यामुळे सर्व इयत्तांमध्ये शिक्षण घेणारी विद्यार्थी माहिती घेतेवेळी उपलब्ध झाली नाहीत. तथापि, नमुना आकार कमी होऊ नये याकरिता माहिती संकलन करताना निवड झालेल्या वसतिगृहांमधील उपस्थित सर्व मुला-मुलीं कडून माहिती घेण्यात आली. सदर योजनेच्या मूल्यमापन पाहणीकरिता आदिवासी विकास विभागा अंतर्गत असलेल्या चारही विभागीय आदिवासी आयुक्तालय क्षेत्रातील वसतिगृहांची यादृश्चिक नमुना पध्दतीने निवड करण्यात आलेली होती. परंतु माहिती संकलनासाठी वसतिगृहातील खूप कमी मुले-मुलीं उपलब्ध होत असल्यामुळे फक्त ठाणे आणि नाशिक विभागीय आयुक्तालयांतर्गत येणाऱ्या वसतिगृहांनाच प्रत्यक्ष भेटी देऊन माहिती गोळा करण्यात आली. उर्वरित अमरावती आणि नागपुर या अतिरीक्त आदिवासी आयुक्तालयांतर्गत असलेल्या विभागातील आदिवासी मुलां-मुलींच्या शासकीय वसतिगृहाच्या गृहपालांची गटचर्चा आयोजित करण्यात आली व सदर योजनेसंबंधी माहिती घेण्यात आली. सदर मूल्यमापन पाहणीचे निष्कर्ष हे पाहणी करण्यात आलेल्या वसतिगृहांवरुन काढण्यात आलेले आहेत त्यामुळे ते सर्व वसतिगृहांना लागु होतीलच असे नाही. सदर मर्यादांचा परिणाम मूल्यमापनावर होऊ नये या दृष्टीने सर्वोतोपरी काळजी घेण्यात आली.

# संख्यिकीय माहितीचे विश्लेषण

**तक्ता क्र. ६. मूल्यमापन पाहणीमध्ये सहभागी झालेल्या मुलां-मुलींची शैक्षणिक शाखे निहाय माहिती**

| अ.क्र. | लिंग | कला | अभियांत्रिकी | विज्ञान | वाणिज्य | डिटिएड | वैद्यकिय | शिक्षण नमुद न केलेले | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुली | ४९ | ८ | १५ | - | २१ | ३ | - | ९६ |
| २ | मुले | ४२ | ४ | १ | ४ | ५ | ३ | २ | ६१ |
| एकुण | | ९१ | १२ | १६ | ४ | २६ | ६ | २ | १५७ |

सदर मूल्यमापन पाहणीमध्ये आठ वसतिगृहातील एकुण १५७ मुलां-मुलींकडून माहिती घेण्यात आलेली. त्यापैकी ९६ मुली व ६१ मुले होते. सदर मुल्यमापन पाहणीमध्ये माहिती घेण्यात आलेले मुले-मुली हे कला, विज्ञान, वाणिज्य, डिटीएड (D.T.Ed.), अभियांत्रिकी व वैद्यकीय इ. वेगवेगळ्या शाखेत शिक्षण घेत होते. यामध्ये कला शाखेत शिक्षण घेणाऱ्या मुला-मुलींची संख्या सर्वात जास्त होती.





**आलेख नं. ३. मूल्यमापन पाहणीमध्ये सहभागी झालेल्या मुलां-मुलींची शैक्षणिक माहिती**

**तक्ता क्र. ७. मूल्यमापन पाहणीमध्ये सहभागी झालेल्या मुलां-मुलींची जमात, लिंग व शैक्षणिक शाखे निहाय माहिती**

| अ. क्र. | जमात नाव | लिंग | डिप्लोमा (D.T.Ed.) | कनिष्ठ महाविद्यालय | वरिष्ठ महाविद्यालय | शिक्षण नमुद नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोकणा | मुले | ०३ | - | १८ | - | २१ |
| | | मुली | ०२ | ०२ | ३३ | - | ३७ |
| | | एकुण | | | | | ५८ |
| २ | भिल्ल | मुले | - | - | ०१ | - | ०१ |
| | | मुली | ०१ | ०१ | ०१ | - | ०३ |
| | | एकुण | | | | | ०४ |
| ३ | ठाकर | मुले | - | - | ०४ | - | ०४ |
| | | मुली | - | - | ०३ | - | ०३ |
| | | एकुण | | | | | ०७ |
| ४ | वारली | मुले | ०२ | - | ०६ | - | ०८ |
| | | मुली | -- | - | ०५ | - | ०५ |
| | | एकुण | | | | | १३ |
| ५ | ढोर कोळी | मुले | - | - | ०२ | - | ०२ |
| | | मुली | - | - | ०२ | - | ०२ |
| | | एकुण | | | | | ०४ |
| ६ | मल्हार कोळी | मुले | - | - | - | - | - |
| | | मुली | - | - | ०१ | - | ०१ |
| | | एकुण | | | | | ०१ |
| ७ | मावची | मुले | - | - | ०१ | - | ०१ |
| | | मुली | - | - | - | - | - |
| | | एकुण | | | | | ०१ |
| ८ | महादेव कोळी | मुले | - | ०९ | ०७ | ०२ | १८ |
| | | मुली | १९ | - | २२ | - | ४१ |
| | | एकुण | | | | | ५९ |
| ९ | जमात नमुद नाही | मुले | ०१ | - | ०९ | - | १० |
| | | मुली | - | - | - | - | - |
| | | एकुण | | | | | १० |
| एकुण | | | २८ | १२ | ११५ | ०२ | १५७ |

सदर मूल्यमापन पाहणीअंतर्गत आदिवासी शासकीय वसतिगृहात राहणाऱ्या महादेव कोळी, कोकणा, भिल्ल, ठाकर, वारली, ढोर कोळी, मल्हार कोळी, आणि मावची इत्यादी जमातीची मुलें-मुलीं होती. यामध्ये सर्वात जास्त महादेव कोळी (५९) व कोकणा (५८) जमातीची मुले-मुलीं होते व त्या खालोखाल वारली जमातीचे १३, ठाकर जमातीचे ७, भिल्ल व ढोर-कोळी जमातीचे प्रत्येकी ४ मुले-मुलीं आणि मल्हार कोळी जमातीची एक मुलगी व मावची जमातीचा एक मुलगा होता. मूल्यमापन अभ्यासामध्ये सहभागी झालेल्या एकुण मुलां-मुलींपैकी सर्वात जास्त मुलींची संख्या (९६) आहे. यामध्ये सर्वात जास्त महादेव कोळी जमातीच्या ४१ मुली आहेत व त्यानंतर कोकणा जमातीच्या ३७ मुली आहेत, वारली जमातीच्या ५ मुली आहेत, ठाकर जमातीच्या ०३ मुली, ढोर कोळी जमातीच्या २ मुली, आणि मल्हार कोळी जमातीची १ मुलगी आढळून आलेली आहे. तसेच सदर मूल्यमापन पाहणीमध्ये शासकीय आदिवासी मुलांच्या वसतीगृहातील ६१ मुलांकडुन माहिती घेण्यात आली. यापैकी कोकणा जमातीची सर्वात जास्त २१ मुले, त्यानंतर कोळी महादेव जमातीचे १८ मुले, वारली जमातीची ८ मुले, ठाकर जमातीची ४ मुले, ढोर कोळी जमातीची २ मुले, भिल्ल व मावची जमातीची प्रत्येकी १ मुलगा यांच्याकडून माहिती घेण्यात आली. माहिती घेण्यात आलेल्या एकुण मुलां-मुलींपैकी दहा मुलांनी आपली जमात नमुद केलेली नाही. एकुण १५७ नमुना आकार पैकी सर्वात जास्त ११५ मुले-मुलीं हे वरीष्ठ महाविद्यालयातील कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी व वैद्यकीय इ. विद्याशाखेत शिकत होते व यामध्ये सर्वात जास्त कोकणा व महादेव कोळी जमातीची अनुक्रमे ५१ व २९ मुले-मुलीं हे वरीष्ठ महाविद्यालयात शिकत होते.



## प्रकरण पाचवे

### ५.१ वसतिगृहातील संगणक कक्षाची सद्यःस्थितीः

राज्यातील आदिवासी मुला-मुलींच्या संगणकीय ज्ञानात वृध्दी करण्यासाठी आदिवासी मुला-मुलींच्या वसतिगृहात अद्ययावत, स्वतंत्र संगणक कक्षाची स्थापना करणे ही योजना सन २०१२-१३ मध्ये राज्यातील एकुण ९२ आदिवासी मुला-मुलींचे वसतिगृहात राबविण्यात आली. शासन निर्णयाप्रमाणे सदर योजने अंतर्गत ९२ वसतिगृहांपैकी निवड केलेल्या वसतिगृहास प्रत्येकी नऊ संगणक, नऊ यु.पी.एस, नऊ खुर्च्या, नऊ टेबल, व पाच प्रिंटर पुरविण्यात आले होते. सदर योजनेचे मूल्यमापन पाहणीमध्ये नमुना निवड पध्दतीने निवडलेल्या ८ वसतिगृहांची पाहणी करण्यात आली व संबंधीत वसतिगृहातील संगणक कक्ष, संगणक व तत्सम यंत्रसामुग्री इत्यादीच्या सद्यःस्थितीबाबत माहिती घेण्यात आली. सदर वसतिगृहांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या संगणक कक्षाची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली व संबंधित वसतिगृहात राहणारे मूला-मुली व गृहपाल/ वसतिगृह कर्मचारी यांच्याकडून संगणक व इतर तत्सम यंत्र सामुग्री बाबत माहिती घेण्यात आली.

वसतिगृहातील संगणक कक्षातील संगणक व तत्सम यंत्रसामुग्रीची सद्यस्थिती पुढीलप्रमाणे :

**१) वसतिगृहाचे नांवः- आदिवासी मुलींचे वसतिगृह, जव्हार जि.पालघर.**

**तक्ता क्र. ८.१ योजने अंतर्गत प्राप्त संगणक व तत्सम यंत्रसामुग्रीची सद्यःस्थिती**

| वसतीगृहाचे नाव | योजने अंतर्गत प्राप्त साहित्य | वसतिगृह स्वतंत्र संगणक कक्ष | वसतिगृह कार्यालय | | साहित्य हस्तांतरीत करण्यात आलेले ठिकाण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | गृहपाल कार्यालय | स्टोअर रूम | प्रकल्प कार्यालय , जव्हार | आश्रमशाळा, पाली |
| आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, जव्हार जि. पालघर | संगणक | ४ | १ | - | ३ | १ |
| | खुर्ची | ५ | १ | १ | २ | - |
| | टेबल | ५ | १ | १ | २ | - |
| | यु.पी. एस. | ४ | १ | - | २ | - |
| | प्रिंटर | - | १ | १ | १ | - |

सदर वसतिगृहातील संगणक कक्षामध्ये फक्त चार संगणक असुन उर्वरीत पाच संगणकांपैकी तीन संगणक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, जव्हार, जि. पालघर येथे तर एक संगणक शासकीय आश्रम शाळा, पाली येथे हस्तांतरीत करण्यात आलेला आहे व उर्वरीत एक संगणक गृहपाल, यांचे कार्यालयात वापरात आहे. इतर तत्सम संगणक यंत्रसामुग्रीपैकी संगणक कक्षामध्ये पाच खुर्च्या, पाच टेबल, चार यु.पी.एस, व एक प्रिंटर उपलब्ध आहे. उर्वरीत तत्सम

संगणक यंत्रसामुग्रीपैकी एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय, जव्हार येथे दोन खुर्च्या, दोन यु.पी.एस, व एक प्रिंटर हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. सदर योजनेंतर्गत प्राप्त इतर यंत्र सामुग्री पैकी एक खुर्ची, एक टेबल, व एक यु.पी.एस. वसतिगृह कार्यालयात वापरात आहे. उर्वरीत एक प्रिंटर वसतिगृहाच्या स्टोअर रूम मध्ये असल्याचे सांगण्यात आले. सदर वसतिगृहातील संगणक कक्षातील उपलब्ध चार संगणकांपैकी एक संगणक नादुरुस्त आहे, दोन संगणकांमध्ये MS-office सॉफ्टवेअर Install केलेले नाही व उर्वरीत एक संगणक विद्यार्थिनींच्या वापराकरीता उपलब्ध असून त्यांचा वापर मुख्यत्वे पेंटींग करणे, गाणी ऐकणे, चित्र काढणे व टायपिंग करणे इत्यादी साठी होतो अशी माहिती विद्यार्थिनींकडून मिळाली. मूल्यमापन पाहणी दरम्यान या वसतिगृहातील संगणक कक्षात एकही प्रिंटर आढळुन आलेला नाही.



२) वसतिगृहाचे नांवः- आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह जव्हार जि.पालघर.

तक्ता क्र. ८.२ योजने अंतर्गत प्राप्त संगणक व तत्सम यंत्रसामुग्रीची सद्यःस्थिती

| वसतिगृहाचे नाव | योजने अंतर्गत प्राप्त साहित्य | वसतिगृह स्वतंत्र संगणक कक्ष | वसतिगृह कार्यालय | | साहित्य हस्तांतरीत करण्यात आलेले ठिकाण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | गृहपाल कार्यालय | स्टोअर रूम | प्रकल्प कार्यालय, जव्हार | नवीन मुलांचे वसतिगृह, जव्हार |
| आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, जव्हार | संगणक | ३ | १ | - | ३ | २ |
| | खुर्ची | ६ | १ | - | - | २ |
| | टेबल | ६ | - | - | १ | २ |
| | यु.पी. एस. | ३ | १ | - | ३ | २ |
| | प्रिंटर | १ | १ | - | १ | - |

सदर वसतिगृहाची पहाणी करण्यात आल्यानंतर संगणक कक्षासंबंधी पुढील बाबी आढळून आल्या. सदर वसतिगृहाच्या संगणक कक्षामध्ये तीन संगणक, सहा खुर्च्या, सात टेबल, तीन यु.पी.एस, व एक प्रिंटर तर वसतिगृह कार्यालयामध्ये प्रत्येकी एक संगणक, खुर्ची, यु.पी.एस. व प्रिंटर इत्यादी यंत्रसामुग्री उपलब्ध आहे. संगणक कक्षातील उपलब्ध तीन संगणकांपैकी एकच संगणक चालु स्थितीतमध्ये असल्याचे विद्यार्थ्यांकडून सांगण्यात आले व प्रत्यक्ष पाहणीमध्ये देखील तसेच आढळले. वसतिगृहास सदर योजनेंतर्गत प्राप्त साहित्यापैकी तीन संगणक, एक टेबल, तीन यु.पी.एस, व एक प्रिंटर इत्यादी साहित्य एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, जव्हार येथे हस्तांतरीत करण्यात आले आहे. उर्वरीत साहित्यापैकी दोन संगणक, दोन खुर्च्या, दोन टेबल, दोन यु.पी.एस, इत्यादी साहित्य नवीन मुलांचे वसतीगृह जव्हार, जि.पालघर येथे हस्तांतरीत करण्यात आलेले आहे.

३) वसतिगृहाचे नांव :- आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, मंचर जि. पुणे.

**तक्ता क्र. ८.३ योजने अंतर्गत प्राप्त संगणक व तत्सम यंत्रसामुग्रीची सद्यःस्थिती**

| वसतिगृहाचे नाव | योजने अंतर्गत प्राप्त साहित्य | वसतिगृह स्वतंत्र संगणक कक्ष | वसतिगृह कार्यालय | | साहित्य हस्तांतरीत करण्यात आलेले ठिकाण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | गृहपाल कार्यालय | स्टोअर रूम | प्रकल्प कार्यालय, घोडेगाव | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, सोमवार पेठ, पुणे |
| आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, मंचर | संगणक | ८ | - | - | - | १ |
| | खुर्ची | ९ | - | - | - | - |
| | टेबल | ९ | - | - | - | - |
| | यु.पी.एस. | ९ | - | - | - | - |
| | प्रिंटर | - | १ | १ | १ | - |

सदर वसतिगृहाची पहाणी केली असता पुढील बाबी आढळून आल्या. सदर वसतिगृहाच्या संगणक कक्षांमध्ये एकुण आठ संगणक, नऊ खुर्च्या, नऊ टेबल, नऊ यु.पी.एस, व दोन प्रिंटर इत्यादी साहित्य उपलब्ध आहे. उर्वरीत एक संगणक आदिवासी मुलींचे वसतिगृह सोमवार पेठ, पुणे येथे तर एक प्रिंटर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगाव ता. आंबेगाव येथे हस्तांतरीत केल्याचे सदर वसतीगृह कार्यालयामार्फत सांगण्यात आले. तसेच उर्वरीत एक प्रिंटर वसतिगृह कार्यालयात आहे आणि एक प्रिंटर स्टोअर रुम मध्ये ठेवले असल्याचे सांगण्यात आले. संगणक कक्षातील सर्व संगणकांची तपासणी करण्यात आली. या संगणकांमध्ये आवश्यक programme upload केलेले होते. परंतु संगणक वापरताना सारखे हँग होतात, भारनियमनामुळे संगणक वापर करता येत नाही, प्रिंट पेजेस उपलब्ध नसणे, तसेच संगणक कक्ष फक्त MS-CIT च्या प्रशिक्षण कालावधीमध्येच सुरू असतो इतर वेळेस बंद असतो अशा प्रकारच्या समस्या वारंवार उद्‌भवत असल्याचे वसतीगृहातील मुलींनी सांगितले. सदर वसतीगृहामध्ये प्रकल्प कार्यालयामार्फत न्युक्लीयस बजेट योजने अंतर्गत काही विद्यार्थिनींसाठी MS-CIT च्या प्रशिक्षणाची सोय करण्यात आल्याची माहिती संबंधित गृहपाल यांनी दिली.

४) वसतिगृहाचे नांव :- आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, मंचर, जि. पुणे.

सदर वसतिगृहाच्या संगणक कक्षाची पहाणी केली असता खालील बाबी आढळून आल्या. वसतिगृहातील संगणक कक्षामध्ये सहा संगणक, पाच खुर्च्या, सात टेबल, सहा यु.पी.एस, इत्यादी साहित्य उपलब्ध होते.

### तक्ता क्र. ८.४ योजने अंतर्गत प्राप्त संगणक व तत्सम यंत्रसामुग्रीची सद्य:स्थिती

| वसतिगृहाचे नाव | योजने अंतर्गत प्राप्त साहित्य | वसतिगृह स्वतंत्र संगणक कक्ष | वसतिगृह कार्यालय | | साहित्य हस्तांतरीत करण्यात आलेले ठिकाण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | गृहपाल कार्यालय | स्टोअर रूम | प्रकल्प कार्यालय, घोडेगाव | आदिवासी मुलांचे वसतिगृह, जुन्नर जि. पुणे |
| आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, मंचर | संगणक | ६ | २ | - | - | १ |
| | खुर्ची | ५ | २ | १ | - | १ |
| | टेबल | ७ | २ | - | - | - |
| | यु.पी. एस. | ६ | १ | १ | - | १ |
| | प्रिंटर | - | १ | १ | - | १ |

उर्वरीत संगणक व तत्सम साहित्यापैकी दोन संगणक, दोन खुर्च्या, दोन टेबल, एक यु.पी.एस, व एक प्रिंटर आदिवासी मुलांचे वसतिगृह, जुन्नर, जि.पुणे येथे हस्तांतरीत करण्यात आल्याचे वसतिगृह कार्यालयामार्फत सांगण्यात आले. सदर वसतिगृहातील संगणक कक्ष कायम स्वरुपी बंद असतो व यामुळे सदर योजनेचा कुठलाही लाभ मिळत नसल्याचे वसतिगृहातील मुलांनी नमूद केले आहे. या वसतिगृहातील संगणक कक्षाची प्रत्यक्ष पाहणी करते वेळेस संगणकांवर धुळ साचलेली होती व योजने अंतर्गत प्राप्त यंत्रसामुग्रीचा अजिबात वापर होत नसल्याचे दिसुन आले. सदर वसतिगृहातील संगणक कक्ष मागील दोन वर्षापासून केबल जळलेली असल्यामुळे बंद असल्याचे कारण गृहपाल यांचेकडून सांगण्यात आले. विद्युतप्रवाह/लाईट नसल्यामुळे सदर संगणक कक्षामधील संगणकांची तपासणी करणे शक्य झाले नाही.




५) वसतिगृहाचे नांवः- आदिवासी मुलांचे वसतिगृह, डांग सौदाणे ता.सटाणा जि.नाशिक.

तक्ता क्र. ८.५ योजने अंतर्गत प्राप्त संगणक व तत्सम यंत्रसामुग्रीची सद्यःस्थिती

| वसतिगृहाचे नाव | योजने अंतर्गत प्राप्त साहित्य | वसतिगृह स्वतंत्र संगणक कक्ष | वसतिगृह कार्यालय | | साहित्य हस्तांतरीत करण्यात आलेले ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| | | | गृहपाल कार्यालय | स्टोअर रूम | प्रकल्प कार्यालय, कळवण जि. नाशिक |
| आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, डांगसौदाने, ता. सटाणा जि. नाशिक | संगणक | ७ (पैकी ४ संगणक नादुरूस्त आहेत) | १ | - | १ |
| | खुर्ची | ७ | २ | - | - |
| | टेबल | ७ | २ | - | - |
| | यु.पी.एस. | ७ | १ | | १ |
| | प्रिंटर | - | १ | - | - |

सदर वसतिगृहाच्या संगणक कक्षाची पहाणी केली असता खालील बाबी आढळून आल्या. सदर वसतिगृहात स्वतंत्र संगणक कक्ष स्थापन केलेला आहे. यामध्ये एकुण ७ संगणक उपलब्ध असुन पैकी ४ संगणक नादुरूस्त असल्यामुळे पूर्ण पणे बंद आहे आणि उर्वरित तीन संगणक चालू आहेत. परंतु या संगणकांमध्ये एम.एस. ऑफिस तसेच इतर अत्यावश्यक सॉफ्टवेअर install केलेली नाहीत. एक संगणक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, कळवण, जि.नाशिक येथे हस्तांतरीत करण्यात आले आहेत. तसेच एक संगणक वसतिगृह कार्यालयात वापरात आहे. योजने अंतर्गत प्राप्त इतर तत्सम संगणक यंत्र सामुग्री पैकी सात खुर्च्या, सात टेबल, सात यु.पी.एस व इत्यादी साहित्य वसतिगृहातील संगणक कक्षामध्ये उपलब्ध आहे. उर्वरीत दोन खुर्च्या, दोन टेबल, एक यु.पी.एस, इत्यादी साहित्य वसतिगृह कार्यालयात आहे. उर्वरीत एक यु.पी.एस एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, कळवण जि.नाशिक येथे हस्तांतरीत करण्यात आला आहे. सदर वसतिगृहास योजने अंतर्गत प्राप्त एकुण ५ प्रिंटर पैकी फक्त एक प्रिंटर वापरात आहे. ५ पैकी उर्वरीत ४ प्रिंटर बाबत कोणतीही माहिती गृहपाल यांनी दिलेली नाही. या वसतिगृहातील संगणक कक्ष मागील काही महिन्यांपासुन काही कारणास्तव बंद असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे वसतिगृहातील संगणक कक्षाचा वापर विद्यार्थ्यांना होत नसल्याचे

विद्यार्थ्यांकडून सांगण्यात आले. सदर संगणक कक्षास कुलुप लावण्यात आलेले असून त्याची चावी ही गृहपाल जवळ असते अशी माहिती प्राप्त झाली.



६) **वसतिगृहाचे नांव :- आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, ता.कळवण जि.नाशिक.**

**तक्ता क्र. ८.६ योजने अंतर्गत प्राप्त संगणक व तत्सम यंत्रसामुग्रीची सद्यःस्थिती**

| वसतिगृहाचे नाव | योजने अंतर्गत प्राप्त साहित्य | वसतिगृह स्वतंत्र संगणक कक्ष | वसतिगृह कार्यालय | | साहित्य हस्तांतरीत करण्यात आलेले ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| | | | गृहपाल कार्यालय | स्टोअर रूम | प्रकल्प कार्यालय, कळवण जि. नाशिक |
| आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, कळवण, जि. नाशिक | संगणक | ५ | - | - | ४ |
| | खुर्ची | ९ | - | - | - |
| | टेबल | ९ | - | - | - |
| | यु.पी. एस. | ९ | - | - | - |
| | प्रिंटर | ३ | - | - | २ |

सदर वसतिगृहाची पाहणी करण्यात आली व संगणक कक्षातील संगणक व तत्सम यंत्रसामुग्री बाबत संबंधीतांकडून माहिती घेण्यात आली. सदर वसतिगृहातील संगणक कक्षामध्ये पाच संगणक वापरासाठी उपलब्ध असुन उर्वरीत चार संगणक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, कळवण, जि नाशिक येथे हस्तांतरीत करण्यात आलेले आहेत. योजने अंतर्गत प्राप्त ५ प्रिंटर पैकी दोन प्रिंटर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, कळवण येथे देण्यात आलेले आहेत व तीन प्रिंटर संगणक कक्षात उपलब्ध आहेत. वसतिगृहातील संगणक कक्षातील सर्व ५ संगणकांमध्ये आवश्यक MS-office pragramme install केलेले आहेत. दोन संगणकांना इंटरनेट कनेक्शन देण्यात आलेले आहे. संगणक कक्षातील संगणक सुरू केल्यानंतर काही वेळाने लगेच बंद पडतात तसेच विद्युत भारनियमनामुळे संगणक वापरात अडथळे येतात अशी माहिती वसतिगृहातील मुलींनी दिली.

**७) वसतिगृहाचे नांव :- आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, पेठ रोड, नाशिक.**

**तक्ता क्र. ८.७ योजने अंतर्गत प्राप्त संगणक व तत्सम यंत्रसामुग्रीची सद्य:स्थिती**

| वसतिगृहाचे नाव | योजने अंतर्गत प्राप्त साहित्य | वसतिगृह स्वतंत्र संगणक कक्ष | वसतिगृह कार्यालय | | साहित्य हस्तांतरीत करण्यात आलेले ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| | | | गृहपाल कार्यालय | स्टोअर रूम | प्रकल्प कार्यालय, नाशिक |
| आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, पेठ रोड, ता. जि. नाशिक | संगणक | ९ | - | - | - |
| | खुर्ची | ९ | - | - | - |
| | टेबल | ९ | - | - | - |
| | यु.पी. एस. | ९ | - | - | - |
| | प्रिंटर | २ | १ | - | - |

सदर वसतिगृहास प्रत्यक्ष भेट देऊन वसतिगृहातील संगणक कक्षाची पाहणी करण्यात आली व संबंधित विद्यार्थीनी व गृहपाल यांच्याकडून माहिती घेण्यात आली. सदर योजने अंतर्गत प्राप्त सर्व संगणक व तत्सम यंत्रसामुग्री संगणक कक्षात उपलब्ध असल्याचे आढळून आले. परंतू संगणक कक्षास नेहमी कुलुप लावलेले असते व किल्ली गृहपाल यांचे जवळ असल्यामुळे सदर सुविधेचा अजिबात वापर करता येत नाही असे संबंधित वसतीगृहातील मुलींनी सांगितले. तसेच सदर वसतिगृहातील संगणक कक्षाचे निरीक्षण केले असता असे आढळले की संगणक, टेबल, Key Board व खुर्ची या वस्तुंवर धुळ साचलेली होती. यावरून संगणक कक्षाचा वापरच होत


नाही असे लक्षात आले. सर्व संगणक चालू केल्यानंतर त्यामध्ये आवश्यक MS-Office pragramme install केलेले आहेत असे आढळून आले.

**८) वसतिगृहाचे नांव :- आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, शारदासदन, नाशिक**

**तक्ता क्र. ८.८ योजने अंतर्गत प्राप्त संगणक व तत्सम यंत्रसामुग्रीची सद्यःस्थिती**

| वसतिगृहाचे नाव | योजने अंतर्गत प्राप्त साहित्य | वसतिगृह स्वतंत्र संगणक कक्ष | वसतिगृह कार्यालय | | साहित्य हस्तांतरीत करण्यात आलेले ठिकाण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | गृहपाल कार्यालय | स्टोअर रूम | जवळच्या दुसऱ्या वसतिगृहास | आयुक्तालय नाशिक |
| आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, ता. जि. नाशिक | संगणक | ४ | १ | - | ३ | १ |
| | खुर्ची | ६ | - | - | ३ | - |
| | टेबल | ६ | - | - | ३ | - |
| | यु.पी. एस | ६ | - | - | ३ | - |
| | प्रिंटर | - | १ | - | - | - |

सदर वसतिगृहास प्रत्यक्ष भेट देण्यात आली व वसतिगृहातील संगणक कक्षाची पहाणी करण्यात आली व संबंधित गृहपाल व विद्यार्थ्यांकडून संगणक कक्षातील विविध बाबींची माहिती घेण्यात आली. सदर वसतिगृहातील संगणक कक्षामध्ये चार संगणक आहेत यापैकी फक्त एक संगणक चालू आहे. उर्वरीत पाच संगणकपैकी तीन संगणक जवळच्या वसतिगृहात देण्यात आलेले आहेत असे सांगण्यात आले. एक संगणक वसतिगृह कार्यालयात आहे व एक संगणक आदिवासी आयुक्तालय, नाशिक येथे हस्तांतरीत करण्यात आला आहे. उर्वरीत तत्सम संगणक संबंधी यंत्रसामुग्रीपैकी सहा खुर्च्या, संगणक कक्षात आहेत व तीन खुर्च्या जवळच्या दुसऱ्या वसतिगृहात हस्तांतरीत करण्यात आलेल्या आहेत, असे संबंधित गृहपालांनी सांगितले. एकुण प्राप्त प्रत्येकी नऊ टेबल व युपिएस पैकी सहा टेबल व सहा युपिएस वसतिगृहाच्या संगणक कक्षात आहेत. उर्वरीत प्रत्येकी तीन टेबल व यु.पी.एस. जवळच्या वसतिगृहास देण्यात आले असल्याचे सांगण्यात आले. सदर योजने अंतर्गत वसतिगृहास प्राप्त ५ प्रिंटर पैकी फक्त एक प्रिंटर वसतिगृह कार्यालयात वापरात आहे. सदर योजने अंतर्गत प्राप्त उर्वरीत ४ प्रिंटर बाबत मूल्यमापन पाहणीमध्ये कोणतीही माहिती मिळाली नाही.



## ५.२ आदिवासी मुलां-मुलीच्या वसतिगृहातील संगणक कक्षातील इतर सोयी सुविधांची माहिती:

सदर योजनेच्या मूल्यमापन करताना आदिवासी मुलां-मुलींच्या वसतिगृहामध्ये संगणक कक्ष संबंधी इतर सोयी-सुविधा जसे की, इंटरनेट, Antivirus स्वतंत्र संगणक कक्ष, जनरेटर/इनर्व्हटर व संगणक प्रशिक्षण इ. विविध बाबीं संदर्भात माहिती घेण्यात आली. सदर योजना चांगल्या प्रकारे राबविण्यासाठी व त्याचा विद्यार्थ्यांना फायदा होण्यासठी इंटरनेट संगणक प्रशिक्षण, स्वतंत्र संगणक कक्ष इ. सुविधा उपलब्ध असणे अतिशय महत्त्वाचे होते. सदर सुविधा वसतिगृहातील मुलां-मुलींना किती प्रमाणात उपलब्ध होत असतात किंवा कसे याबाबत माहिती प्राप्त करण्यासाठी योजना राबविण्यात आलेल्या वसतिगृहांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली, संबंधीत वसतिगृहात राहणाऱ्या मुले-मुलीं व गृहपाल यांच्याकडून विहीत केलेल्या प्रपत्रात/प्रश्नावली मध्ये माहिती भरुन घेण्यात आली. तसेच वसतिगृहातील मुलां-मुलींचा संगणक, इंटरनेट वापर व वसतिगृहातील इतर सोयी-सुविधा संबंधीत माहिती प्राप्त करण्यासाठी शासकीय वसतीगृहांच्या गृहपालांची गटचर्चा आयोजित करण्यात आली.

**तक्ता क्र.९. शासकीय वसतिगृहात मुलां-मुलींकरिता संगणक संबंधित उपलब्ध सुविधा**

| अ क्र | वसतिगृहाचे नाव | इंटरनेट सुविधा | जनरेटर/ इन्व्हर्टर | अॅन्टीव्हायरस प्रणाली | स्वतंत्र संगणक कक्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, जव्हार | नाही | नाही | नाही | आहे |
| २ | आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, जव्हार | नाही | नाही | नाही | आहे |
| ३ | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, मंचर | आहे | नाही | नाही | आहे |
| ४ | आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, मंचर | नाही | नाही | नाही | आहे |
| ५ | आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, डांगसौंदाने, ता. सटाणा जि. नाशिक | नाही | नाही | नाही | आहे |
| ६ | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, कळवण, जि. नाशिक | आहे | नाही | नाही | आहे |
| ७ | आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, ता. जि. नाशिक | नाही | नाही | नाही | आहे |
| ८ | आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, जि. नाशिक | नाही | नाही | नाही | आहे |

पाहणी करण्यात आलेल्या वसतिगृहातील संगणक कक्षाबाबत मिळणा-या सोयी-सुविधांची माहिती खालीलप्रमाणे :-

क्षेत्रीय पहाणीसाठी निवड झालेल्या सर्व आठही वसतीगृहांची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर असे आढळून आले की, जवळपास सर्व वसतिगृहामध्ये स्वतंत्र संगणक कक्ष उपलब्ध आहे. जेथे वसतिगृहात स्वतंत्र संगणक कक्षास पुरेशी जागा नाही अशा ठिकाणी योजने अंतर्गत प्राप्त संगणक व इतर यंत्रसामुग्री मुलां-मुलींच्या खोल्यांमध्ये ठेवण्यात येतात अशी माहिती मूल्यमापन संबंधी आयोजित गटचर्चेतून समोर आली. अशा परिस्थितीमध्ये संगणकांचा वापर चित्रपट पाहणे, गाणी ऐकणे, इ. करीता केला जातो, संगणक संबंधित साहित्याची अयोग्यरीत्या हाताळणी, तसेच टेबल, खुर्ची या साहित्याची तोडफोड होते. यामुळे संगणक व इतर यंत्रसामुग्रीचा गैरवापर होत असून यावर संबंधित वसतिगृहातील गृहपालांचे नियंत्रण राहत नसल्याची माहिती गृहपालांनी दिली.

इंटरनेट सुविधा, संगणक प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक, जनरेटर/इन्व्हर्टर, व संगणकांना ॲन्टीव्हायरस (अपडेटेड) इत्यादी महत्वपूर्ण बाबी पाहणी करण्यात आलेल्या पैकी कोणत्याही वसतीगृहात आढळल्या नाही. आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, मंचर जि.पुणे येथील वसतिगृहात स्वतंत्र संगणक कक्ष असुन दोन संगणकास इंटरनेट जोडणी/कनेक्शन आहे अशी माहिती संबंधित गृहपाल यांच्याकडून सांगण्यात आले. तथापी, सदर वसतिगृहात इंटरनेट सुविधा उपलब्ध नसल्याची माहिती संबंधित वसतिगृहातील मुलींनी दिलेली आहे. आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, कळवण जि. नाशिक या वसतिगृहाच्या कार्यालयातील एका संगणकास इंटरनेट कनेक्शन असुन सदर इंटरनेटचा वापर वसतिगृहातील मुली करतात असे सांगण्यात आले. परंतु फक्त एका संगणकास इंटरनेट कनेक्शन असल्यामुळे त्याचा वापर अतिशय मर्यादीत स्वरूपाचा आहे. मूल्यमापन पाहणी करण्यात आलेल्या कोणत्याही वसतिगृहात मुलां-मुलींच्या वापराकरीता स्वतंत्रपणे वेगळी इंटरनेट सुविधा देण्यात आलेली नाही. तसेच सदर योजनेच्या शासन निर्णयामध्ये देखील इंटरनेट सुविधा देण्याविषयाी कोणतीही तरतुद करण्यात आलेली नव्हती. सदर योजनेच्या मूल्यमापनासंबंधी घेण्यात आलेल्या गटचर्चेमध्ये व प्रश्नावलीमध्ये इंटरनेट सुविधा पुरविण्याविषयी संबंधींतांकडे मागणी केल्याची माहिती संबंधित वसतिगृहांच्या गृहपालांनी दिली. आदिवासी वसतिगृहातील मुलां-मुलींच्या वापराकरीता सदर योजने अंतर्गत स्थापन करण्यात येणाऱ्या स्वतंत्र संगणक कक्षामध्ये इंटरनेट सुविधा देण्याची मागणी सर्व मुलां-मुलींमार्फत करण्यात आली.

आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, मंचर जिं. पुणे संगणक कक्षाची पाहणी केल्यानंतर असे आढळले की, सदर संगणक कक्षामध्ये विद्युतप्रवाह अनुपलब्ध असुन संगणकांवर धुळ साचलेली आहे व संगणक साहित्य वापराविना पडून आहे. सदर वसतिगृहातील संगणक कक्ष मागील दोन वर्षापासून बंद असल्याचे संबंधित गृहपालांमार्फत सांगण्यात आले. यामुळे सदर वसतिगृहातील मुलां-मुलींना संगणक वापराकरिता उपलब्ध होत नाही. तसेच आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, डांगसौंदाने ता. सटाणा जि. नाशिक व आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, पेठ रोड ता. जि. नाशिक या वसतिगृहातील संगणक कक्ष कायम बंद असतात अशी माहिती संबंधित वसतीगृहातील मुलां-मुलींनी दिली.

सदर योजने अंतर्गत स्वतंत्र संगणक कक्ष स्थापन करण्यात येऊन देखील इंटरनेट, प्रशिक्षक सारख्या आवश्यक बाबी उपलब्ध नसल्यामुळे वसतीगृहात राहणाऱ्या मुलां-मुलींना या योजनेचा आवश्यक लाभ मिळत नसल्याचे निर्दशनास आले.

**५.३ वसतिगृहातील मुलां-मुलींचा संगणक वापर व कौशल्य याबाबत माहिती:-**

सदर योजनेच्या मूल्यमापन पाहणीमध्ये नमुना निवड पध्दतीने निवडलेल्या आदिवासी वसतिगृहातील मुलां-मुलींचे संगणक हाताळणी बाबतचे ज्ञान, प्राप्त केलेली संगणक संबंधी प्रमाणपत्रे, संगणकीय कौशल्ये, संगणक व इंटरनेट या बाबींचा वापर व खर्च इत्यादी विषयक माहिती घेण्यात आली. या संबंधीची माहिती तक्ता क्र. १० ते १५ मध्ये देण्यात आलेली आहे व त्याचे विश्लेषण खालीलप्रमाणे नमूद करण्यात आलेली आहे.

**तक्ता क्र. १०. पाहणीसाठी निवड करण्यात आलेल्या वसतिगृहातील मुलां-मुलींनी खाजगी संस्थामार्फत प्राप्त केलेली संगणक विषयक प्रमाणपत्रांबाबत माहिती**

| लिंग | MS-CIT | CCC | Tally | Networking and Hardware |
|---|---|---|---|---|
| मुले | २९ | ३ | १ | १ |
| मुली | ५९ | १ | - | - |
| एकुण | ८८ | ४ | १ | १ |

**तक्ता क्र. ११. पाहणीसाठी निवड करण्यात आलेल्या वसतिगृहातील मुलां-मुलींना सदर वसतिगृहात प्रवेश घेण्यापूर्वी प्राप्त असलेली संगणक कौशल्ये व तसेच मूल्यमापन पाहणीच्या वेळेस प्राप्त असलेली संगणक कौशल्ये बाबत माहिती :**

| लिंग | वापर | संबंधीत वसतिगृहात प्रवेश घेण्यापुर्वी असलेले प्राथमिक ज्ञान (संख्या) | मूल्यमापन संबंधी माहिती घेतेवेळी प्राप्त असलेली कौशल्ये(संख्या) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | MS-Word | MS-Excel | MS-Powerpoint |
| मुली | होय | ५८ | ७४ | ६७ | ६१ |
| | नाही | ३५ | ०२ | - | - |
| | उत्तर नमूद नाही | ०३ | २० | २९ | ३५ |
| मुले | होय | २४ | ३२ | २६ | २५ |
| | नाही | ३४ | ०३ | ०२ | ०३ |
| | उत्तर नमूद नाही | ०३ | २६ | ३३ | ३३ |
| एकुण | | १५७ | १५७ | १५७ | १५७ |

**तक्ता क्र. १२. इंटरनेट वापर करता येणाऱ्यां मुलां-मुलींची संख्या**

| लिंग | इंटरनेट वापरकर्ते संख्या |
|---|---|
| मुले | २२ |
| मुली | ५४ |
| एकुण | ७६ |

मूल्यमापन पाहणीमध्ये माहिती घेण्यात आलेल्या शासकीय आदिवासी वसतिगृहातील एकुण १५७ मुलां-मुलींपैकी ८२ मुलां-मुलींनी (५८ मुली व २४ मुले) संबंधीत वसतिगृहात प्रवेश घेण्यापुर्वीच संगणक हाताळणीबाबतचे प्राथमिक ज्ञान असल्याची माहिती दिली. ५९ मुली व २९ मुलांकडे म्हणजे एकुण ८८ मुलां-मुलींनी MS-CIT चे प्रमाणपत्र प्राप्त केलेले आहे. ३ मुलांनी व एका मुलीने CCC (Certificate Course in Computer) चे प्रमाणपत्र प्राप्त केलेले आहे. आठ विद्यार्थ्यांना Tally चे वापराचे ज्ञान असुन त्यापैकी एका विद्यार्थ्याकडे Tally प्रमाणपत्र प्राप्त केलेले आहे. त्याचबरोबर दोन मुलांनी DTP (Desktop publishing) चे प्रमाणपत्र प्राप्त केलेले आहेत. एका मुलाने नेटवर्किंग ॲन्ड हार्डवेअर चे प्रमाणपत्र प्राप्त केलेले आहे. एकुण ३० विद्यार्थ्यांकडे म्हणजे १५ मुले व १५ मुली यांच्याकडे स्वतः चा ई-मेल आयडी आहे. मूल्यमापन पाहणीमध्ये माहिती घेण्यात आलेल्या एकुण मुलां-मुलीं पैकी ७४ मुलींना व ३२ मुलांना एम. एस. वर्ड (MS-word) वापरता येते, ६७ मुली व २६ मुलांना एक्सेल (Excel) वापरता येते व ६१ मुलींना व २५ मुलांना पॉवरपॉईंट (Power-point) वापरता येतो. एकूण माहिती घेण्यात आलेल्या १५७ आदिवासी मुलां-मुलींपैकी २२ मुले व ५४ मुलींना स्वतः इंटरनेटचा वापर करता येतो. (तक्ता क्र. १९). उर्वरीत मुले-मुलीं इंटरनेट संबंधी कामे करून घेण्यासाठी आपल्या मित्र-मैत्रिणींची मदत घेतात किंवा संबंधित इंटरनेट सेवा पुरवठादारास जास्त रक्कम देऊन काम करून घेतात.

वरील माहिती वरुन असे समजते की, संगणक संबंधी विविध कोर्स करणे तसेच खाजगी सायबर कॅफेतील संगणकांचा वापर केल्यामुळे वसतिगृहातील मुलां-मुलींनी चांगल्याप्रकारे संगणकीय कौशल्ये आत्मसात केलेली आहेत. पाहणी करण्यात वसतिगृहातील मुलां-मुलींनी आत्मसात केलेली संगणकीय कौशल्ये, प्रमाणपत्रे, तसेच त्यांच्यामार्फत केला जाणारा संगणक/इंटरनेट यांचा वापर यावरुन असे दिसते की, ते स्वतः संगणकीय ज्ञान प्राप्त करण्याबाबत जागरुक व प्रयत्नशील आहेत. याचबरोबर असेही दिसून येते की पाहणी करण्यात आलेल्या वसतिगृहांतील सर्व मुलां-मुलींना संगणक हाताळणीचे प्राथमिक ज्ञान अवगत नाही.

मूल्यमापन पाहणीमध्ये आदिवासी शासकीय वसतिगृहातील मुलां-मुलींचा मोबाईल व्दारे इंटरनेट वापर तसेच वसतिगृहा बाहेर इतरत्र होणारा इंटरनेटचा वापर व या बाबींवर होणारा खर्च याची माहिती घेण्यात आली.

### तक्ता क्र. १३. मोबाइल व्दारे होणारा इंटरनेटचा वापर करणाऱ्या मुलां-मुलींची संख्या

| अ.क्र. | लिंग | मोबाईल व्दारे इंटरनेटचा वापर | संख्या |
|---|---|---|---|
| १ | मुली | होय | २७ |
| | | नाही | ६७ |
| | | उत्तर नमुद नाही | ०२ |
| २ | मुले | होय | ३४ |
| | | नाही | २६ |
| | | उत्तर नमुद नाही | ०१ |
| एकुण (मुले + मुली) | | | १५७ |

### तक्ता क्र.१४.पाहणीसाठी निवड करण्यात आलेल्या वसतिगृहातील मुलां-मुलींमार्फत खाजगी संस्थेव्दारे संगणक/इंटरनेटचा होणारा वापर (संख्या)

| अ.क्र. | लिंग | खाजगी संस्थामधून इंटरनेटचा वापर | संख्या |
|---|---|---|---|
| १ | मुली | होय | ८१ |
| | | नाही | १२ |
| | | उत्तर नमुद नाही | ०३ |
| २ | मुले | होय | ५३ |
| | | नाही | ०६ |
| | | उत्तर नमुद नाही | ०२ |
| एकुण | | | १५७ |

मूल्यमापन पाहणीत सहभागी झालेल्या एकुण १५७ वसतिगृहातील मुलां-मुलींपैकी १३४ जण विविध कारणांसाठी इंटरनेट चा वापर करतात. यापैकी ६१ विद्यार्थी (३४ मुले व २७ मुली) मोबाईल/भ्रमणध्वनी द्वारे इंटरनेट चा (Pocket Internet) वापर करतात. मोबाईल द्वारे इंटरनेट चा वापर करण्याऱ्यांमध्ये मुलांचे प्रमाण जास्त असुन तुलनेने मुलींचे प्रमाण कमी आहे. आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, जव्हार, आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, डांगसौंदाणे ता. सटाणा व आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, कळवण या वसतिगृहांतील फक्त दोनच मुले मोबाईलव्दारे इंटरनेटचा वापर करतात. यावरुन असे दिसते की, दुर्गम व डोंगराळ भागातील वसतिगृहांत राहणाऱ्या मुलां-मुलींचा मोबाईल द्वारे होणारा इंटरनेट चा वापर तुलनेने शहरामधील किंवा शहराजवळील वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या मुलां-मुलींपेक्षा कमी प्रमाणात आहे. शहरी व ग्रामीण/दुर्गम, डोंगराळ भागातील मुलां-मुलींचा तुलनात्मक अभ्यासावरून असे दिसुन आले की, दुर्गम, डोंगराळ भागातील शासकीय आदिवासी वसतिगृहांतील बहुतेक सर्व मुले-मुली वसतिगृहा बाहेरील इतरत्र असलेल्या खाजगी इंटरनेट सुविधेचा वापर करतात.

सदर योजने अंतर्गत वसतिगृहामध्ये इंटरनेट कनेक्शन न पुरविल्यामुळे विद्यार्थी इतरत्र ठिकाणी वसतिगृहाबाहेरील ठिकाणी कुठेतरी जाऊन इंटरनेट सुविधेचा वापर करतात तसेच काही विद्यार्थी मोबाईल व्दारे इंटरनेटचा वापर करतात. डोंगराळ भागात राहणा-या आदिवासी विद्यार्थ्यांना नोकरी संबंधी, स्कॉलरशीप, शैक्षणिक वर्गात प्रवेश घेणे किंवा इतर कारणांकरिता कोणताही ऑनलाईन फॉर्म भरण्यासाठी खाजगी इंटरनेट पुरवठादाराकडुन प्रति फॉर्म १०० रुपये फी आकारली जाते. परिणामी या बाबीवर होणारा विद्यार्थ्यांचा खर्च देखील वाढत आहे. त्यामुळे वसतिगृहातील संगणक कक्षामध्येच इंटरनेट जोडणी दिल्यास विद्यार्थ्यांचा सदर सुविधांवर होणारा खर्च तसेच वेळेची बचत होईल तसेच ते स्वतः online form भरणे, नोकरी शोधणे इ. कामे स्वतः करू शकतील.

प्रशासकीय गतिमानतेसाठी व नागरीकांच्या सोयीसाठी शासनामार्फत ई-गव्हर्नंस प्रकल्प मोठ्या प्रमाणात राबविण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत शासनाचे विविध विभागाचे काम प्रगतिपथावर आहे. यामध्ये इंटरनेट सुविधेचा वापर करुन नवीन माहिती गोळा करणे, Job शोधणे, शिष्यवृत्ती अर्ज भरणे, शैक्षणिक विषयासंबंधी माहिती शोधणे, विविध माहितीचे नमुने, परवाने, प्रमाणपत्रे, मंजुरीपत्र, पैसे भरणे व त्याची रिसीट, अर्जाच्या सद्यःस्थितीची तपासणी, इ. यासाठी इंटरनेट सुविधा उपलब्ध करणे व त्याचा वापर करणे क्रमप्राप्त आहे.

➢ **वसतिगृहातील संगणक कक्ष वगळता इतर ठिकाणी वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांना येणाऱ्या खर्चा संबंधी माहिती**

मूल्यमापन पाहणीत सहभागी झालेल्या एकुण १५७ विद्यार्थ्यांपैकी १३२ मुले-मुली मोबाईलव्दारे किंवा वसतिगृहाच्या बाहेरील उपलब्ध असलेल्या इंटरनेट सुविधांचा वापर करतात व याकरिता त्यांना येणाऱ्या आर्थिक खर्चा संबंधीची माहिती तक्ता क्र. १५ मध्ये नमुद करण्यात आली आहे.

**तक्ता क्र. १५. पाहणीसाठी निवडण्यात आलेल्या वसतिगृहातील मुलां-मुलींचा इंटरनेट वापरावर होणारा खर्च**

| अ.क्र. | खर्च (रुपयामध्ये) /(प्रति महिना) | मोबाईल व्दारे इंटरनेटसाठी खर्च करणाऱ्या मुलां-मुलींची संख्या | खजगी सायबर कॅफे मार्फत इंटरनेटवर खर्च करणाऱ्या मुलां-मुलींची संख्या |
|---|---|---|---|
| १ | रू. ५० पर्यंत | १५ | ०३ |
| २ | रु. ५१ ते १०० | १७ | ३५ |
| ३ | रु. १०१ ते २०० | १० | ३९ |
| ४ | रु.२०१ ते ३०० | ०१ | १० |
| ५ | रु.३०१ पेक्षा जास्त | ०८ | २७ |
| एकुण | | ५१ | ११४ |

मूल्यमापन पाहणी करण्यात आलेल्या आदिवासी वसतिगृहांतील एकुण १५७ मुलां-मुलींपैकी ५१ मुलां-मुलींनी मोबाईल/भ्रमणध्वनी व्दारे इंटरनेट वापरावर होणाऱ्या खर्चाची माहिती दिली, तसेच वसतिगृहाबाहेरील इतरत्र असलेल्या इंटरनेट सुविधेच्या वापरावर होणाऱ्या खर्चासंबंधीची माहिती ११४ मुलां-मुलींनी दिली.

एकुण १५७ मुलां-मुलींपैकी ११४ मुले-मुली वसतिगृहाबाहेरील खाजगी मालकीच्या इंटरनेट सुविधा केंद्रात जाऊन स्वतः इंटरनेट संबंधी कामे करतात किंवा ज्यांना इंटरनेट वापरता येत नाही ते मित्र-मैत्रीणीची मदतीने अथवा जास्त फी देऊन संबंधित खाजगी इंटरनेट सुविधा केंद्र चालकाकडून काम करून घेतात.

यावरुन असे दिसते की वसतिगृहातील मुलां-मुलींकडून विविध कामांकरिता मोबाईलव्दारे आणि वसतिगृहाबाहेरील इतरत्र असलेल्या खाजगी संगणक व इंटरनेट सुविधांचा वापर मोठया प्रमाणावर होत आहे. यासाठी होणारा आर्थिक खर्च वसतिगृहातील मुलां-मुलींना न परवडणारा आहे. जर वसतिगृहातील स्वतंत्र संगणक कक्षातील सर्व संगणक इंटरनेट सुविधेसहित संबंधित मुलां-मुलींसाठी वापरात असते, तर या बाबींवर वसतिगृहातील मुलां-मुलींचा होणारा खर्च कमी प्रमाणात झाला असता.

➢ **सदर योजने बाबत वसतीगृहातील मुलां-मुलींचा अभिप्रायः**

सदर योजने बाबत आदिवासी वसतिगृहातील मुलां-मुलींचे अभिप्राय प्रश्नावलीव्दारे व अनौपचारीक चर्चेच्या माध्यमातून जाणून घेण्यात आले. आदिवासी शासकीय वसतिगृहात राबविण्यात येणाऱ्या सदर योजनेबाबत संबंधित वसतिगृहातील मुले-मुली आशावादी आहेत. मूल्यमापन पाहणी करण्यात आलेल्या शासकीय आदिवासी वसतिगृहातील मुलां-मुलींनी सदर योजनेच्या सद्य:स्थितीबाबत अनेक तक्रारी व कमतरता नमूद केलेल्या आहेत.

ज्या वसतिगृहामध्ये मुलां-मुलींच्या वापरासाठी काही संगणक उपलब्ध आहेत अशा वसतिगृहातील मुलां-मुलींनी सदर योजनेमुळे टायपिंगचा सराव करणे, पेंटिंग करणे, अशा प्रकारची कामे करता येतात असे सांगितले. यामुळे त्यांना शैक्षणिक कामात विशेष फायदा झालेला नाही. ज्या वसतीगृहातील संगणक कक्षातील संगणक बंद किंवा नादुरूस्त आहेत अशा वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी सदर विद्यार्थ्यानी योजनेबाबत नकारात्मक अभिप्राय दिलेला आहे. त्यामध्ये संगणक कक्ष कायम बंद असणे, संगणकांची संख्या कमी असणे, संगणकांमध्ये MS-word, Excel, Powerpoint , इंटरनेट सुविधा अनुपलब्ध असणे, प्रिंटर नादुरुस्त असणे, प्रिंट पेजेस उपलब्ध नसणे, संगणक प्रशिक्षक नसणे आदी बाबींसंदर्भात तक्रारी करण्यात आलेल्या आहेत.

सदर योजना वसतीगृहात योग्यप्रकारे राबविल्यास आत्मविश्वास वाढेल, तसेच भविष्यात चांगली नोकरी मिळविण्यासाठी फायदा मिळू शकतो, अशी माहिती आदिवासी वसतिगृहातील मुलां-मुलींनी दिली.

## ५.४ गटचर्चा (Focused Group Discussion)

मूल्यमापन पाहणीमध्ये निवड झालेल्या वसतिगृहांना प्रत्यक्ष भेट देऊन प्राथमिक माहिती गोळा केल्यानंतर आदिवासी मुलां-मुलींच्या शासकीय वसतिगृहांच्या गृहपालांची (FGD) गटचर्चा आयोजित करण्यात आली. सदर गटचर्चेमध्ये एकुण २० आदिवासी मुलां-मुलींचे शासकीय वसतिगृहातील गृहपाल सहभागी झाले होते. या गटचर्चेमध्ये सहभागी झालेल्या व्यक्तींची निवड सहेतूक नमुना निवड पध्दतीने (Purposive Sampling Method) करण्यात आली. सदर गटचर्चामध्ये सहभागी झालेले सर्व गृहपाल हे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे येथे प्रशिक्षणा करीता उपस्थित असतांना त्यांना गटचर्चामध्ये सहभागी करून घेण्यात आले. या गटचर्चामध्ये सदर योजना राबविण्यात आलेल्या ६ वसतिगृहांतील गृहपाल व योजना राबविण्यात न आलेल्या १४ वसतिगृहांतील गृहपाल सहभागी झाले होते.

या गटचर्चेमध्ये शासकीय आदिवासी वसतिगृहातील पायाभूत सुविधा, संगणक संबंधी योजनेची माहिती, वसतिगृहातील मुलां-मुलींचा संगणक वापर, सदर योजना राबविताना वसतिगृह कार्यालयास येणाऱ्या अडचणी, योजने बाबतचे अभिप्राय इत्यादी विषयांवर चर्चा करण्यात आली.

**तक्ता क्र.१६. गटचर्चामध्ये सहभागी झालेल्या गृहपालांची अतिरिक्त आदिवासी आयुक्तालय निहाय संख्या**

| अ. क्र. | अतिरिक्त आदिवासी आयुक्तालय | गृहपालांची संख्या |
|---|---|---|
| १ | अतिरिक्त आदिवासी आयुक्तालय, ठाणे | ०५ |
| २ | अतिरिक्त आदिवासी आयुक्तालय, नाशिक | ०६ |
| ३ | अतिरिक्त आदिवासी आयुक्तालय, अमरावती | ०४ |
| ४ | अतिरिक्त आदिवासी आयुक्तालय, नागपुर | ०५ |

सदर गटचर्चामधुन खालील महत्वपुर्ण विषयांवर गृहपालांनी आपली मते व्यक्त केले:

गृहपाल, आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, चामोर्शी जि. गडचिरोली यांनी असे सांगितले की दुर्गम, आदिवासी भागामध्ये आदिवासी मुलां-मुलींकरीता इंटरनेट सुविधा उपलब्ध करणे आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच, अलापल्ली सारख्या दुर्गम भागात पायाभूत सुविधांची कमतरता आहे. या भागात विजेचे भारनियमन जास्त आहे तसेच भ्रमणध्वनी मनोऱ्यांची संख्या

कमी असल्यामुळे Range नसते. या कारणांमुळे अशा दुर्गम भागात इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देणे अवघड असल्याचे मत व्यक्त केले.

वसतिगृहात स्वतंत्र संगणक कक्ष स्थापन करण्यासाठी पुरेशी जागा नसल्यामुळे सदर योजने अंतर्गत प्राप्त संगणक व इतर साधनसामुग्री संबंधित वसतिगृहातील मुलां/मुलींच्या खोल्यांमध्ये ठेवण्यात येतात. यामुळे संबंधित वसतिगृहाच्या गृहपालाचे या वस्तुंच्या वापरावर कोणतेही नियंत्रण राहत नाही. अशा परिस्थितीमध्ये संगणकांचा गैरवापर केला जातो, तसेच संगणक नादुरुस्त होतात व टेबल, खुर्च्यांची मोडतोड होते. या कारणांमुळे सदर योजने अंतर्गत प्राप्त संगणक व तत्सम साधनसामुग्री गृहपालाच्या नियंत्रणाखाली राहील अशी व्यवस्था करण्यात यावी.

सदर योजने अंतर्गत प्राप्त संगणकांचा वापर वसतिगृहातील मुले-मुलीं पेंटींग करणे, एम. एस. वर्ड वापरणे, गेम खेळणे, तसेच प्रोजेक्ट ची कामे करणे इत्यादी बाबींकरीता करतात, अशी माहिती गटचर्चा दरम्यान गृहपालांनी दिली.

गटचर्चामध्ये गृहपालांनी असे मत व्यक्त केले की, सदर योजने अंतर्गत आदिवासी मुलां-मुलींच्या वसतिगृहातच संगणक कक्ष स्थापन करण्यात आलेला असल्यामुळे त्याचे उचित महत्व त्यांना समजून येत नाही. वसतिगृहातील संगणक वापरा बाबतची शिस्त पाळली जात नाही. तसेच यांवर नियंत्रण ठेवणे संबंधित गृहपालास अवघड जात आहे. या सर्व कारणांमुळे सदर योजने अंतर्गत आदिवासी मुलां-मुलींच्या वसतिगृहात स्वतंत्र संगणक कक्ष स्थापन न करता इतरत्र ठिकाणी जसे तहसील कार्यालय, गटविकास अधिकारी कार्यालय, महाविद्यालय इ. येथे आदिवासी मुलां-मुलीं करीता संगणक कक्ष स्थापन करण्यात यावा. जेणेकरून मुलां-मुलींना या संगणक वापराचे उचित महत्व समजुन येईल. तसेच या संगणक कक्षावर नियंत्रण ठेवणे व वापराबाबतचे नियोजन करणे सोपे होईल असे मत व्यक्त केले.


सदर योजने अंतर्गत निवडलेल्या वसतिगृहांना प्रत्येकी नऊ संगणक व इतर तत्सम यंत्रसामुग्री देण्यात आली होती. या वसतिगृहांमधील प्रवेश क्षमता, संगणक नादुरूस्त असणे व इतर ठिकाणी हस्तांतर होणे या बाबींचा विचार करता मुलां-मुलींसाठी प्रत्यक्ष वापराकरीता उपलब्ध होणाऱ्या संगणकांची संख्या कमी आहे. या कारणांमुळे वसतिगृहातील सर्व मुलां-मुलींना या योजनेचा लाभ घेता येत नाही. यासाठी सदर योजने अंतर्गत वसतिगृहांना दिल्या जाणाऱ्या संगणकांची संख्या वाढविण्यात यावी.

सदर योजने अंतर्गत प्राप्त संगणक दुरूस्तीचा खर्च वसतिगृहाच्या इलेक्ट्रिक शिर्षकाखाली करण्यात येतो अशी माहिती गृहपालांनी दिली.

सदर योजने अंतर्गत संगणक व इतर यंत्रसामुग्रीचा पुरवठा करणाऱ्या एजन्सी या पुणे, नाशिक या दूरच्या भागातील असल्यामुळे वसतिगृहास वेळेवर पुरवठा होवू शकलेला नाही. तसेच वॉरंटी कालावधीमध्ये दुरुस्ती व देखभाल खर्च संबंधित पुरवठादार एजन्सीने करावयाचा असल्याकारणाने

या संबंधित वसतिगृहांच्या जिल्हयातीलच किंवा जवळच्या असणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले गेले.

संगणकीय वापराबाबतच्या अनिवार्यतेचा विचार करता, सदर योजना सर्व आदिवासी मुलां-मुलींच्या वसतिगृहात राबविण्याची आवश्यकता असल्याचे मत संगणक संबंधी योजना राबविली न गेलेल्या वसतीगृहातील गृहपालांनी व्यक्त केले.



## ५.५ वसतिगृहांत स्थापन करण्यात आलेल्या संगणक कक्षासंबंधी येणाऱ्या अडचणी:


सदर योजनेच्या मूल्यमापन पाहणी दरम्यान वसतिगृहातील मुलां-मुलींना तसेच गृहपाल यांनी संगणक कक्षातील संगणक संबंधी वापराबाबत येणाऱ्या विविध अडचणींची दिलेली माहिती खालिलप्रमाणे:

१) सदर योजने अंतर्गत निवडलेल्या वसतिगृहांना प्रत्येकी नऊ संगणक व इतर तत्सम यंत्रसामुग्री देण्यात आली होती. या वसतिगृहांची विद्यार्थी प्रवेश क्षमता ही कमीत कमी १५० व जास्तीत जास्त ३५० पर्यंत आहे. सदर योजने अंतर्गत प्राप्त यंत्रसामुग्रीपैकी काही इतर ठिकाणी जसे प्रकल्प कार्यालय, आश्रमशाळा, इतर वसतिगृहे इत्यादी ठिकाणी हस्तांतरीत करण्यात आलेली आहेत. तसेच मूल्यमापन पाहणी करण्यात आलेल्या वसतिगृहामध्ये नादुरुस्त, वापरात नसलेल्या संगणक व इतर यंत्रसामुग्रीची संख्या जास्त आहे. वसतिगृहात प्रत्यक्ष राहत असलेल्या मुलां-मुलींच्या संख्येचा विचार करता त्यांच्या वापराकरिता संगणक संख्या कमी आहे. या कारणांमुळे वसतिगृहातील सर्व मुलां-मुलींना या योजनेचा लाभ मिळत नाही.

२) वसतिगृहामध्ये मुख्यत्वे: दुर्गम व डोंगराळ भागातील मुले-मुली प्रवेश घेतात. या भागातील मुलां-मुलींमध्ये संगणक शिक्षणाचे महत्व पटवुन देण्यासाठी व संगणक हाताळणीचे मार्गदर्शन देण्याकरिता संगणक प्रशिक्षकाची अत्यंत आवश्यकता असते. संगणक प्रशिक्षका शिवाय उपलब्ध संगणक यंत्रणेचा वसतिगृहातील मुले-मुलीं पुरेपुर वापर करु शकत नाहीत. याकरिता वसतिगृहातील मुलां-मुलींनी संबंधितांकडे संगणक प्रशिक्षकाची नेमणुक करण्याविषयी वारंवार मागणी केली असल्याची माहिती मूल्यमापन पाहणी दरम्यान प्राप्त झाली.

३) आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये इंटरनेटचा वापर अनिवार्य झालेला आहे. वसतिगृहात स्थापन करण्यात आलेल्या संगणक कक्षामध्ये इंटरनेट कनेक्शन नसल्यामुळे मुलां-मुलींना इंटरनेट संबंधित कामे जसे ऑनलाईन अर्ज भरणे, शिष्यवृत्ती अर्ज करणे, नवीन माहिती गोळा करणे तसेच शैक्षणिक विषयाशी संबंधित अद्ययावत माहिती गोळा करणे इत्यादी कामांकरिता वसतिगृहा बाहेर इतरत्र ठिकाणी उपलब्ध असलेल्या खाजगी संस्थेकडे जावे लागते. यामध्ये त्यांचा वेळेचा अपव्यय व आर्थिक खर्च देखील जास्त होतो. दुर्गम भागात इंटरनेट सुविधा कमी प्रमाणात असल्यामुळे या भागातील विद्यार्थ्यांना तुलनेने जास्त खर्च करावा लागतो. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना रुपये १०० प्रति ऑनलाईन अर्ज इतका खर्च येत असल्याचे डांगसौंदाणे ता. सटाणा येथील मुलांनी सांगितले. सदर योजनेच्या मूल्यमापन पाहणीमध्ये कोणत्याही वसतिगृहात मुलां-मुलींच्या वापराकरिता स्वतंत्रपणे इंटरनेट सुविधा आढळून आली नाही. सदर योजनेच्या शासन निर्णयामध्ये शासकीय आदिवासी मुलां-मुलींच्या वसतिगृहात इंटरनेट सुविधा पुरविण्याबाबत उल्लेख नाही.

४) मूल्यमापन पाहणीमध्ये असे आढळून आले की काही वसतिगृहातील संगणक कक्ष कायम बंद असल्यामुळे सदर योजनेचा कोणताही लाभ संबंधित वसतिगृहातील मुलां-मुलींना घेता येत नाही. प्रकल्प कार्यालय, घोडेगाव अंतर्गत येणारे आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, मंचर, व नाशिक प्रकल्प कार्यालया अंतर्गत येणारे आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, पेठ रोड आणि कळवण प्रकल्प कार्यालया अंतर्गत येणारे आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, डांगसैंदाणे ता. सटाणा जि. नाशिक या तीनही वसतिगृहातील संगणक कक्षास कायम कुलुप लावलेले असते अशी माहिती वसतिगृहातील मुलां-मुलींनी दिली.



५) वसतीगृहातील संगणक कक्षामध्ये प्रिंटर उपलब्ध नसणे किंवा नादुरुस्त असणे, प्रिंट पेजेस उपलब्ध नसणे इत्यादी समस्या पाहणी करण्यात आलेल्या सर्व वसतिगृहात आढळून आल्या.

६) वसतिगृहातील संगणक कक्षातील संगणक वापरताना अचानक बंद पडणे, हँग होणे, संगणकांमध्ये MS-Word, Excel, Powerpoint इत्यादी आवश्यक बाबी देखील install नसणे, वेळेवर दुरुस्त्या न होणे यामुळे मुलां-मुलींना सदर सुविधेचा वापर करणे शक्य होत नाही.

७) सदर योजनअंतर्गत प्राप्त संगणक प्रणाली सुरक्षित ठेवण्यासाठी ६० दिवसांकरिता अँटी व्हायरस टाकण्यात (Quick heal) आलेला आहे अशी माहिती आयुक्तालय, नाशिक यांच्यामार्फत देण्यात आली. परंतू मूल्यमापन पाहणी करण्यात आलेल्या कोणत्याही वसतिगृहातील संगणकास अँटी व्हायरस टाकलेला असल्याचा आढळून आले नाही. तसेच इंटरनेट कनेक्शन नसल्याने अँटी व्हायरस अपडेट होणे शक्य झाले नाही.

८) सदर योजने अंतर्गत आदिवासी मुलां/मुलीच्या वसतिगृहातील संगणक कक्षामध्ये असलेल्या संगणक व इतर साहित्य यावर देखरेख ठेवणे यासाठी आवश्यक मनुष्यबळाची कमतरता असल्याचे वसतिगृह प्रशासनातर्फे सांगण्यात आले.

९) काही वसतिगृहात स्वतंत्र संगणक कक्षास पर्याप्त जागा नसल्यामुळे संगणक व तत्सम यंत्रसामुग्री वसतिगृहातील मुलां-मुलींच्या खोल्यांमध्ये वापराकरीता दिले जातात. यामुळे या वस्तुंच्या वापरावर संबंधित गृहपालाचे कोणतेही नियंत्रण राहत नाही. परिणामी, संगणक व इतर यंत्रसामुग्रीचा गैरवापर होणे, नादुरुस्त होणे, टेबल व खुर्च्यांची मोडतोड होणे इ. बाबी घडतात.

१०) संगणक व प्रिंटर या पुरवठा झालेल्या साहित्याची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी तीन वर्षापर्यंत (वॉरंटी कालावधी) संबंधित पुरवठाधारक एजन्सीची आहे असे सदर योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीमध्ये नमूद आहे. तथपि, वसतिगृहाच्या संगणक कक्षातील नादुरूस्त किंवा योग्य रीतीने कार्यरत नाही अशा संगणक व प्रिंटर या यंत्रसामुग्रीचा देखभाल व दुरूस्ती संबंधीत खर्च वसतिगृहामार्फत केला जातो अशी माहिती सर्व मूल्यमापन पाहणीमध्ये, तसेच गटचर्चामध्ये गृहपालांनी दिली. यावरुन असे समजते की संबंधित गृहपाल यांना योजने बाबत महत्वपुर्ण बाबींची माहिती नसून शासन निर्णयात नमुद केलेल्या महत्वपुर्ण बाबींचे पालन झालेले नाही.

प्रकरण सहावे

## निष्कर्ष

सदर मूल्यमापन पाहणीमध्ये खालील महत्वपुर्ण बाबी आढळून आल्या:

पाहणी करण्यात आलेल्या वसतिगृहापैकी आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, पेठ रोड, नाशिक या वसतिगृहाचा अपवाद वगळता कोणत्याही वसतिगृहात सदर योजने अंतर्गत प्राप्त झालेले सर्व संगणक व तत्सम यंत्रसामुग्री पुर्ण संख्येने संबंधित वसतीगृहातील मुले-मुलींच्या वापराकरिता उपलब्ध नाव्हती. यापैकी काही यंत्रसामुग्री संबंधित एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय किंवा इतर वसतिगृहांमध्ये हस्तांतरीत करण्यात आलेली आहेत अथवा वापराविना पडून आहे.

मूल्यमापन पाहणीत असे आढळले की एकुण ८ वसतिगृहांपैकी ३ वसतिगृहातील स्वतंत्र संगणक कक्ष कायम बंद असल्यामुळे संबंधित वसतिगृहातील मुले-मुलीं सदर योजनेच्या लाभापासुन वंचित आहेत. संबंधित वसतिगृह कार्यालयाच्या उदासीनतेमुळे सदर योजने अंतर्गत प्राप्त संगणक व इतर यंत्रसामुग्री वापराविना पडून आहेत.

वसतिगृहांतील एकुण प्रवेश क्षमतेचा विचार करता असे दिसुन येते की सदर योजने अंतर्गत प्राप्त संगणकांची संख्या कमी असल्यामुळे वसतिगृहातील सर्व मुलां-मुलींना संगणक वापरास मिळत नाही.

क्षेत्रीय पहाणीसाठी निवड झालेल्या सर्व आठही वसतिगृहांची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर असे आढळून आले की, सर्व वसतीगृहामध्ये स्वतंत्र संगणक कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. गटचर्चानुसार काही वसतिगृहांमध्ये स्वतंत्र संगणक कक्षा करीता पुरेशी जागा उपलब्ध नसल्यामुळे संगणक मुलां-मुलींच्या खोल्यांमध्ये वापरासाठी दिले जातात. यामुळे या संगणकांवर संबंधित वसतीगृहातील गृहपालाचा कोणतेही नियंत्रण राहत नाही.

सदर योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार संगणक व प्रिंटर या पुरवठा झालेल्या साहित्याची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी तीन वर्षापर्यंत (वॉरंटी कालावधी) संबंधित पुरवठाधारक एजन्सीची होती. तथापी, मूल्यमापन पाहणी करण्यात आलेल्या विविध वसतिगृहांच्या संगणक कक्षातील नादुरुस्त संगणक तसेच प्रिंटर यांची संख्या लक्षणीय आढळून आली. तसेच संगणक, प्रिंटर दुरूस्ती संबंधी खर्च वसतिगृहामार्फत केला जातो अशी माहिती सर्व गृहपालांनी दिलेली आहे. यावरुन असे समजते की संबंधित गृहपाल यांना योजने बाबत महत्वपुर्ण बाबींची माहिती नाही. त्यामुळे असे म्हणता येईल की शासन निर्णयात नमुद केलेल्या महत्वपुर्ण बाबींचे पालन झालेले नाही.

पाहणी करण्यात वसतिगृहातील मुलां-मुलींनी खाजगी संस्थामार्फत आत्मसात केलेली संगणकीय कौशल्ये, प्राप्त केलेली प्रमाणपत्रे, तसेच त्यांच्यामार्फत केला जाणारा संगणक/इंटरनेट यांचा वापर यावरुन असे दिसते की ते स्वतः संगणकीय ज्ञान प्राप्त करण्याबाबत जागरुक व प्रयत्नशील आहेत.

वसतीगृहातील मुलां-मुलींकडून वसतिगृहाबाहेरील इतरत्र ठिकाणी असलेल्या संगणक व इंटरनेट सुविधेचा वापरासाठी होणारा खर्च जास्त प्रमाणात आहे. जर सदर योजना योग्यप्रकारे राबविण्यात आली असती तर संबंधित वसतिगृहातील मुलां-मुलींचा आर्थिक खर्च कमी झाला असता व वेळेची देखील बचत झाली असती. त्यामुळे असे म्हणता येईल की, सदर योजना योग्य प्रकारे न राबविण्यात आल्यामुळे वसतिगृहातील मुलां-मुलींना फारसा फायदा झालेला नाही.

## शिफारसी

### १) सदर योजने अंतर्गत वसतिगृहास प्राप्त होणाऱ्या संगणकांची संख्या वाढविणे

वसतिगृहातील एकुण मंजूर प्रवेश क्षमता तसेच प्रत्यक्षात प्रवेश घेतल्या जाणाऱ्या मुलां-मुलींची संख्या विचारात घेतली असता असे दिसून येते की संगणक कक्षांमधील प्रति विद्यार्थी संगणकांची उपलब्धता ही अत्यंत कमी आहे. जे संगणक व तत्सम यंत्रसामुग्री उपलब्ध झालेली आहे त्यापैकी काही संगणक व तत्सम यंत्रसामुग्री इतरत्र हस्तांतरीत करण्यात आलेले आहेत व काही नादुरुस्त आहेत. यामुळे मुलां-मुलींना संगणक वापरास उपलब्ध होत नाही. संगणक कक्षातील संगणकांची संख्या वाढविल्यास सदर योजनेचा वसतिगृहातील सर्व मुलां-मुलींना लाभ घेता येईल. यासंबंधी ११ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयामध्ये वसतीगृहामधील प्रती १० विद्यार्थ्यांसाठी १ संगणक, इंटरनेट सुविधेसह उपलब्ध बरून देण्यात यावा असे नमुद केलेले आहे. तथापि, भविष्यात सदर योजना राबविताना सदर शासन निर्णय विचारात घेणे आवश्यक आहे.

### २)संगणक प्रशिक्षण देण्याकरिता संगणक प्रशिक्षकाची नियुक्ती करणे

आदिवासी मुला-मुलींच्या वसतिगृहामध्ये मुख्यत्वे दुर्गम, डोंगराळ, शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या भागातील विद्यार्थी प्रवेश घेतात. या भागातील माहिती व तंत्रज्ञानाचा वापर हा अत्यंत अल्प आहे. त्यामूळे विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान देण्यासाठी प्रशिक्षक असणे हे अत्यंत गरजेचे आहे. संगणक प्रशिक्षकाच्या द्वारे वसतिगृहातील विद्यार्थ्यांना संगणकाचे मुलभूत ज्ञान, MS-CIT तसेच Tally, Net working & Hardware, व इतर आवश्यक Software संबंधीची माहिती दिली जावी तसेच वरिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांद्वारे कनिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांना संगणक हाताळणीचे प्राथमिक ज्ञान देण्याबाबत प्रोत्साहन द्यावे. तसेच मानधन तत्वावर एक प्रशिक्षकाची (२-३ तासांकरीता किंवा आठवडयातुन दोन दिवसाकरीता) नेमणुक करण्यात यावी.

### ३) वसतीगृहात Internet Connection/Wi-Fi सुरु करणे

भौगोलिक विलगतेमुळे आदिवासी भागात दळण-वळण तसेच माहिती तंत्रज्ञान इत्यादी च्या सोयी-सुविधांची स्थिती अभाव असतो. आदिवासी भाग मुख्य प्रवाहा सोबत जोडण्यासाठी व प्रशासकीय गतिमानतेसाठी या भागातील पायाभुत सुविधा मध्ये वाढ करणे गरजेचे आहे. वसतिगृहातील संगणक कक्षामध्ये Internet Connection/Wifi सुविधा पुरविण्यात यावी जेणेकरुन सर्व विद्यार्थी-विद्यार्थीनींना शैक्षणिक कामकाजात, तसेच ऑनलाईन Online अर्ज भरणे, नवीन माहिती शोधणे यासाठी फायदा होईल. वसतिगृहात सदर योजना राबवत असतानाच Internet Connection/Wi-Fi सुविधा संगणक कक्षात दिली जावी. तसेच संगणक संबंधी योजना तयार करतानाच त्यामध्ये Internet Connection/Wifi या सुविधांकरिता आर्थिक तरतुद असावी.

४) **संगणक दुरुस्ती करणे:** मूल्यमापन पहाणी मध्ये असे आढळून आलेले आहे की सर्वच वसतिगृहांत काही संख्येने संगणक नादुरूस्त अवस्थेत आहेत. अशा संगणकाचा वापर होण्याकरीता त्यांची तातडीने दुरुस्ती करणे महत्वाचे आहे. संबंधित वसतिगृहाच्या गृहपालाने याबाबतीत पुढाकार घेऊन संगणक कक्षातील सर्व संगणक विद्यार्थ्यांकरिता वापरात राहील यादृष्टीने नेहमी प्रयत्नशील असावे. संगणक कक्षातील सर्व संगणकांना आवश्यक Software install केलेले असावेत. वसतिगृहातील संगणक कक्षातील संगणक व्हायरस पासून सुरक्षित ठेवण्यासाठी Antivirus update केलेला असावा. संगणक दुरूस्ती व देखभाल खर्च या संबंधी शासन निर्णयात नमुद अटी व शर्थींचे पालन होणे गरजेचे आहे.

५) वसतिगृहामध्ये विविध विद्याशाखेमध्ये शिक्षण घेणारे मुलां-मुलीं राहतात जसे की इंजिनिअरिंग, मॅनेजमेंट, वैद्यकशास्त्र इ. या वेगवेगळया विद्याशाखेत शिकणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना शैक्षणिक कार्यासाठी विविध सॉफ्टवेअर चा वापर करावा लागतो. मुलां-मुलींच्या मागणीनुसार संबंधित वसतिगृह कार्यालयाने संगणकांमध्ये अत्यावश्यक सॉफ्टवेअर अपलोड करुन द्यावेत.

६) सदर योजना वसतिगृहामध्ये यशस्वीपणे राबविण्यासाठी संबंधित गृहपालाची भुमिका महत्वाची आहे. आदिवासी मुलां-मुलींच्या वसतिगृहात संगणक संबंधी योजना राबविण्यापुर्वी संबंधीत गृहपाल/कर्मचारी यांना सदर योजनेचे महत्व योजना राबविताना येणाऱ्या अडचणी व उपाययोजना तसेच इतर तांत्रिक गोष्टीबाबत माहिती दिली जावी. यासाठी प्रकल्प कार्यालय स्तरावर एक कार्यशाळा आयोजित करून त्यामध्ये योजनेसंबंधी शासन निर्णय, योजना कशी राबविली जावी या संबंधी माहिती दिली जाणे क्रमप्राप्त आहे. सदर योजना प्रभावी राबविण्याकरिता संबंधित वसतिगृहाच्या गृहपाल यांनी स्वयंस्फूर्तपणे पुढाकार घेणे आवश्यक आहे.

७) प्रकल्प कार्यालय स्तरावरुन राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विकास योजना/न्युक्लियस बजेट अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या संगणक प्रशिक्षण संबंधित योजना जसे एम.एस.सी.आय.टी, सी.सी.सी, टंकलेखन, लघुटंकलेखन इत्यादी प्रशिक्षण कार्यक्रम, तसेच शासन निर्णय ११ नोव्हेंबर २०११ ची योग्य सांगड घालुन या योजना वसतिगृहातील मुलां-मुलीं करिता राबविण्यात याव्यात. जेणेकरुन यामध्ये शासनाचे खर्चात कपात होवू शकते, व या बचत झालेल्या रकमेमधुन प्रत्येक वसतिगृहामध्ये मानधन तत्वावर एक प्रशिक्षक नेमणे शक्य होईल. या प्रशिक्षकामुळे विद्यार्थ्यांना/विद्यार्थिनींना संगणक हाताळणे शक्य होईल व त्यांचे शैक्षणिक संदर्भातील कामकाज करणे सुलभ होईल. तसेच संगणक व इतर यंत्रसामुग्रीची देखभाल करता येईल.

८) सदर योजने अंतर्गत प्राप्त सर्व संगणक व तत्सम साहित्य इत्यादींचा उपयोग फक्त संबंधित वसतीगृहातील मुलां-मुलींसाठीच केला जावा. सदर योजने अंतर्गत प्राप्त संगणक व इतर यंत्रसामुग्री इतरत्र ठिकाणी हस्तांतरीत करण्यात येऊ नये.

९) सदर योजेने अंतर्गत प्राप्त संगणक व इतर यंत्रसामुग्री वसतिगृहातील मुलां-मुलींच्या खोल्यांमध्ये न देता स्वतंत्र संगणक कक्षात ठेवण्यात याव्यात.

१०) आदिवासी आयुक्तालय, नाशिक यांच्या पुरवठा आदेशानंतर योजनेंतर्गत निवड झालेल्या वसतिगृहावर संगणक व इतर तत्सम साहित्य पोहोच झाल्यानंतर त्यासंबंधी कोणतीही तक्रार वसतिगृह किंवा प्रकल्प अधिकाऱ्याकडून करण्यात आली नसल्याचे आदिवासी आयुक्तालय, नाशिक यांच्या कार्यालयातर्फे स्पष्ट करण्यात आलेले आहे. तथापि, मूल्यमापन पाहणी करण्यात आलेल्या वसतिगृहांतील संगणक बंद स्थितीत पडून आहेत यामुळे संबंधित वसतिगृहातील मुलां-मुलींना सदर योजनेचा लाभ घेता येत नाही. तरी याबाबत संबंधित गृहपालांनी शासन निर्णय अन्वये संबंधित पुरवठादारांकडून तातडीने दुरूस्त्या करून घेणे आवश्यक आहे. संगणक कक्षासंबंधी येणाऱ्या अडचणीं बाबत वसतिगृह कार्यालयाने त्वरित वरिष्ठ कार्यालयास कळविणे गरजेचे आहे. संगणक योजनेसंबंधी येणाऱ्या अडचणीं सोडविण्यासाठी जलद कार्यवाही करण्यात यावी.

११) सदर योजना राबविण्यात आलेल्या वसतिगृहांच्या संगणक कक्षातील सर्व वस्तुंच्या सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्यात यावा.

१२) सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी व आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थी-विद्यार्थीनींना सदर योजनेचा जास्तीत जास्त लाभ मिळावा यासाठी संबंधित प्रकल्प अधिकाऱ्याने आवश्यक कार्यवाही करावी.

सदर योजना उपयुक्त असून मूल्यमापन पाहणीत वरील प्रमाणे आढळलेल्या त्रुटी दूर करून सदर योजनेची अंमलबजावणी योग्य पध्दतीने होण्यासाठी शासनस्तरावरून योग्य त्या सुचना निर्गमित करण्यात याव्यात.

## परिशिष्ट

क्र. १. प्रकल्प निहाय संगणक कक्ष स्थापन करण्यात आलेल्या वसतिगृहांची संख्या

| अ.क्र. | प्रकल्प कार्यालयाचे नाव | मुलांचे वसतिगृह | मुलींचे वसतिगृह | एकुण |
|---|---|---|---|---|
| १. | नाशिक | ७ | ३ | १० |
| २. | कळवण | ३ | ३ | ६ |
| ३. | नंदूरबार | ६ | २ | ८ |
| ४. | तळोदा | ७ | ३ | १० |
| ५. | यावल | ३ | - | ३ |
| ६. | राजुर | ३ | १ | ४ |
| ७. | शहापूर | १ | २ | ३ |
| ८. | जव्हार | २ | १ | ३ |
| ९. | डहाणू | २ | १ | ३ |
| १०. | पेण | २ | - | २ |
| ११. | घोडेगांव | ३ | १ | ४ |
| १२. | मुंबई | १ | - | १ |
| १३. | पांढरकवडा | ० | ३ | ३ |
| १४. | धारणी | ३ | १ | ४ |
| १५. | अकोला | १ | १ | २ |
| १६. | औरंगाबाद | २ | - | २ |
| १७. | नागपूर | २ | १ | ३ |
| १८. | देवरी | १ | - | १ |
| १९. | चंद्रपूर | ३ | - | ३ |
| २०. | चिमुर | - | १ | १ |
| २१. | अहेरी | २ | १ | ३ |
| २२. | गडचिरोली | ७ | ५ | १२ |
| २३. | भामरागड | १ | - | १ |
| | **एकुण** | **६२** | **३०** | **९२** |

मूल्यमापन पाहणीमध्ये माहिती घेण्यात आलेल्या प्रत्येक वसतिगृहामधील मुलां-मुलींची जमातीनिहाय व शैक्षणिक माहिती तक्ता-

१) आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, जव्हार जि. पालघर.

| शैक्षणिक माहिती | | डिटिएड | कनिष्ठ महाविद्यालय | वरिष्ठ महाविद्यालय | शिक्षण नमुद नाही | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| जमातीचे नाव | ठाकर | - | - | २ | - | २ |
| | वारली | - | - | ३ | -- | ३ |
| | ढोर-कोळी | - | - | २ | - | २ |
| | महादेव कोळी | - | - | १ | - | १ |
| एकुण | | | | | | ८ |

२) आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, जव्हार जि. पालघर.

| शैक्षणिक माहिती | | डिटिएड | कनिष्ठ महाविद्यालय | वरिष्ठ महाविद्यालय | शिक्षण नमुद नाही | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| जमातीचे नाव | वारली | २ | - | ६ | - | ८ |
| | ढोर-कोळी | - | - | २ | - | २ |
| | कोकणा | - | - | ५ | - | ५ |
| | ठाकुर | - | - | ३ | - | ३ |
| | महादेव कोळी | - | १ | २ | - | ३ |
| | जमात नमुद नाही | - | - | २ | - | २ |
| एकुण | | | | | | २३ |

४) आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, कळवण जि. नाशिक.

| शैक्षणिक माहिती | | डिटिएड | कनिष्ठ महाविद्यालय | वरिष्ठ महाविद्यालय | शिक्षण नमुद नाही | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| जमातीचे नाव | कोकणा | - | - | १९ | - | १९ |

५) आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, डांगसौंदाने ता सटाणा जि नाशिक.

| शैक्षणिक माहिती | | डिटिएड | कनिष्ठ महाविद्यालय | वरिष्ठ महाविद्यालय | शिक्षण नमुद नाही | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| जमातीचे नाव | कोकणा | - | - | ७ | - | ७ |
| | भिल्ल | - | - | १ | - | १ |
| एकुण | | | | | | ८ |

६) आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, पेठ रोड, नाशिक.

| शैक्षणिक माहिती | | डिटिएड | कनिष्ठ महाविद्यालय | वरिष्ठ महाविद्यालय | शिक्षण नमुद नाही | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| जमातीचे नाव | कोकणा | २ | २ | १४ | - | १८ |
| | वारली | - | - | २ | - | २ |
| | भिल्ल | १ | १ | १ | - | ३ |
| | महादेव कोळी | - | - | ८ | - | ८ |
| | मल्हार कोळी | - | - | १ | - | १ |
| | मावची | - | - | १ | - | १ |
| | जमात नमुद नाही | - | - | २ | - | २ |
| एकुण | | | | | | ३५ |

**७) आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, शारदासदन, नाशिक.**

| वसतीगृहाचे नाव | | डिटिएड | कनिष्ठ महाविद्यालय | वरिष्ठ महाविद्यालय | शिक्षण नमुद नाही | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| जमातीचे नाव | कोकणा | ३ | - | ६ | - | ९ |
| | महादेव कोळी | - | - | १ | - | १ |
| | जमात नमुद नाही | - | - | ५ | - | ५ |
| एकुण | | | | | | १५ |

**८) आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, मंचर जि पुणे.**

| शैक्षणिक माहिती | | डिटिएड | कनिष्ठ महाविद्यालय | वरिष्ठ महाविद्यालय | शिक्षण नमुद नाही | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| जमातीचे नाव | महादेव कोळी | १८ | - | १४ | - | ३२ |
| | ठाकर | - | - | १ | - | १ |
| | जमात नमुद नाही | - | - | १ | - | १ |
| एकुण | | | | | | ३४ |

**९) आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, मंचर जि पुणे.**

| शैक्षणिक माहिती | | डिटिएड | कनिष्ठ महाविद्यालय | वरिष्ठ महाविद्यालय | शिक्षण नमुद नाही | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| जमातीचे नाव | महादेव कोळी | - | ८ | ४ | २ | १४ |
| | ठाकर | - | - | १ | - | १ |
| एकुण | | | | | | १५ |

११)पाहणी करण्यात आलेल्या वसतिगृहांतील मुलां-मुलींची जमातनिहाय शैक्षणिक माहितीः-

| अ.क्र. | जमातीचे नाव | डिप्लोमा | कनिष्ठ महावि-द्यालय | वरिष्ठ महाविद्यालय | शिक्षण नमुद नाही | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोकणा | ५ | २ | ५१ | - | ५८ |
| २ | भिल्ल | १ | १ | २ | - | ४ |
| ३ | ठाकर | - | - | ७ | - | ७ |
| ४ | वारली | २ | - | ११ | - | १३ |
| ५ | ढोर कोळी | - | -- | ४ | - | ४ |
| ६ | मल्हार कोळी | - | - | १ | - | १ |
| ७ | मावची | - | - | १ | - | १ |
| ८ | महादेव कोळी | १९ | ९ | २९ | २ | ५९ |
| ९ | जमात नमुद नाही | १ | - | ९ | - | १० |
| एकुण | | २८ | १२ | ११५ | २ | १५७ |

* * * *